THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

SATURDAY, 12TH JANUARY 1895.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

# PART IX.—Marathi Acts, &c.

## हिंदुस्थान सरकार.

## लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांचा खालीं लिहिलेला आक्ट ज्याला गव्हर्नर जनरल ह्यांनीं तारीख १२ माहे आक्टोबर सन १८९४ रोजीं मंजूर केला, तो लोकांस जाहीर होण्यासाठीं ह्यावरून प्रसिद्ध केला असे:—

### सन १८९४ चा आक्ट १२ वा.

### सन १८९४ चा हिंदुस्थानचे लश्करी आईन सुधारण्याकरितां आक्ट.

अणुक्रमणिका.

कलमें.

१. सरनामा व सुरुवात.

२. हिंदुस्थानच्या लश्करी आईनांच्या १ ल्या भागाची रकम (क) रद्द करणें.

३. १ ल्या भागाच्या (ड) रकमेच्या ऐवजीं नवीन रकम दाखल करणें.

४. १ ल्या भागाच्या (ई) रकमेच्या ऐवजीं नवीन रकम दाखल करणें.

५. १ ल्या भागाच्या (फ) रकमेच्या ऐवजीं नवीन रकम दाखल करणें.

कलमें.

६. २ ऱ्या भागाच्या १ ल्या सदराच्या ऐवजीं नवीन सदर दाखल करणें.

७. ७ व्या आईनाचा कांहीं भाग रद्द करणें.

८. त्याच आईनाच्या तिसऱ्या वाक्याच्या ऐवजीं नवीन वाक्य दाखल करणें.

९. ८ व्या आईनाची सुधारणा.

१०. १० व्या व ११ व्या आईनांच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

११. २४ व्या आईनाची सुधारणा.

कलमें.

१२. २५ व्या व २६ व्या आईनांच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

१३. ३१ व्या आईनाच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

१४ ३९ व्या आईनाच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

१५. ४० व्या आईनाची सुधारणा.

१६. ४७ व्या आईनाच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

१७. ५७ व्या आईनाच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

१८. ६५ व्या आईमाची सुधारणा.

१९. ६६ व्या आईनाच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

२०. ६९ व्या आईनाची सुधारणा.

२१. ७१ व्या आईनाच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

२२. ७२ व्या आईनाच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

२३. आईन ७३ व ७४ ह्यांच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

२४. आईन ७५, ७७, ७८ व ७९ रद्द करणें.

२५. ७६ व्या आईनाची सुधारणा.

२६. आईन ८० व ८१ ह्यांच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

२७. ८२ व्या आईनाची सुधारणा.

२८. त्याच आईनाची आणखी सुधारणा.

२९. ८२ व्या आईनाच्या नंतर नवीन आईन दाखल करणें.

३०. आईन ८३, ८४ व ८५ ह्यांच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

३१. आईन ८६ ते ८९ यांच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

३२. आईन ९० ते ९७ ह्यांच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

३३. १०० व्या आईनाच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

३४. १०१ ला आईन रद्दकरणें.

कलमें.

३५. १०२ व्या आईनाच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

३६. १०३ व्या आईनाच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

३७. १०४ व्या आईनाच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

३८. १०७ व्या आईनाची सुधारणा.

३९. १०८ व्या आईनानंतर नवीन आईन दाखल करणें.

४०. ११४ वा आईन रद्दकरणें.

४१. ११६ व्या आईनाच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

४२. ११७ व्या आईनाच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

४३. आईन ११९ व १२० यांच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

४४. आईन १२२ ते १२४ ह्यांच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

४५. आईन १२५ ते १२९ हे रद्दकरणें.

४६. १३० व्या आईनाची सुधारणा.

४७. १३१ व्या आईनाच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

४८. १३२ व्या आईनाची सुधारणा.

४९. आईन १३३ ते १३७ ह्यांऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

५०. १३८ व्या आईनाची सुधारणा.

५१. १३९ व्या आईनाची सुधारणा.

५२. आईन १४२ ते १४९ हे रद्दकरणें.

५३. आईन १५० व १५१ ह्यांची सुधारणा.

५४. १५१ व्या आईनांत जास्त मजकूर दाखल करणें.

५५. १५२ व्या आईनाची सुधारणा.

५६. सदर्हू आईनाची आणखी सुधारणा.

५७. १५५ व्या आईनांत नवीन शब्द दाखल करणें.

५८. सदर्हू आईनांत जास्त मजकूर दाखल करणें.

५९. आईन १५६ ते १५९ हे रद्द करणें.

कलमें.

६०. १६० व्या आईनाच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

६१. १६१ व्या आईनाची सुधारणा.

६२ १६१ व्या आईनानंतर एक नवीन आईन दाखल करणें.

६३. १६२ व्या आईनाच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

६४. १६३ व्या आईनाची सुधारणा.

६५. १६४ व्या आईनाच्या बदला नवीन आईन दाखल करणें

६६. १६५ व्या आईनाची सुधारणा.

कलमें.

६७. १६६ व्या आईनाची सुधारणा.

६८. १६८ व्या आईनाची सुधारणा.

६९. १६९ व्या आईनाची सुधारणा.

७०. १७० व्या आईनाचा कांहीं भाग रद्द करणें.

७१. आईन १७१ ते १७५ ह्यांच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

७२. आईन १७६ ते १७९ ह्यांच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

७३. भाग ३ ह्याच्या बदला नवीन भाग दाखल करणें.

७४. सदर्हू आईनांत दुसरी पुरवणी दाखल करणें.


---

## मलिका माआझमांच्या हिंदुस्थानच्या लश्कराचा बंदोबस्त ठेवण्याविषयींचे लश्करी आईन सुधारण्याकरितां आक्ट.

ज्याअर्थी मलिका माआझमांच्या हिंदुस्थानच्या लश्कराचा बंदोबस्त ठेवण्याविषयींचे लश्करी आईन सुधारणें योग्य आहे, त्याअर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे :—

१. (१) या आक्टास सन १८९४ चा हिंदुस्थानचे लश्करी आईन सुधारण्याकरितां आक्ट असें ह्मणावें; आणि — सरनामा व सुरुवात.

(२) तो, गव्हर्नर जनरल इन कौन्सिल हे त्याची अमलांत येण्याची जी तारीख इंडिया गझेटमध्यें जाहिरनामा देऊन नेमितील, त्या तारखेरोजीं अमलांत येईल.

२. हिंदुस्थानचे लश्करी आईन (ज्यांस यांत पुढें "सदर्हू आईन" असें ह्मटलें आहे) यांच्या १ ल्या भागाची रकम (क) ही यावरून रद्द केली आहे. — हिंदुस्थानच्या लश्करी आईनांच्या १ ल्या भागाची रकम (क) रद्द करणें.

३. सदर्हू आईनांच्या १ ल्या भागाच्या (ड) रकमेच्या बदला खालीं दिलेला मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणें :— — १ ल्या भागाच्या (ड) रकमेच्या ऐवजीं नवीन रकम दाखल करणें.

### "(ड).—आईनांची व्याप्ति.

"हे आईन—

(अ) ज्या मनुष्यांस ते हल्लीं खरोखर लागू आहेत त्या सर्वांस,

(ब) मलिका माआझमांच्या हिंदुस्थानच्या लश्कराचे एतद्देशीय अमलदार ह्मणून सनद दिलेल्या किंवा तसे अमलदार ह्मणून गझेटांत नांवें प्रसिद्ध केलेल्या सर्व मनुष्यांस अगर त्या लश्कराचे वारंट अमलदार ह्मणून गझेटांत नांवें प्रसिद्ध केलेल्या सर्व मनुष्यांस,

(क) ताब्यांतील सर्व वैद्यकीय अमलदारांस,

(ड) या आईनांअन्वयें प्रतिज्ञा केलेल्या सर्व मनुष्यांस

(ई) प्रतिज्ञा न केलेल्या सर्व रिक्रूटांस,

(फ) या आईनांअन्वयें पटांत नांवें दाखल केलेल्या सर्व मनुष्यांस,

(ग) एऱ्हवीं लश्करी कायदा लागू नसणाऱ्या ज्या मनुष्यांस, मोहिमेच्या वेळीं, तळ दिला असेल तेव्हां, कूच करीत असतांना, किंवा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं या बाबतींत जाहिरनामा प्रसिद्ध करून निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही सरहद्दीवरील ठाण्यावर, मलिका माआझमांच्या हिंदुस्थानच्या लश्करानें नोकरीस ठेविलें असेल, किंवा जे त्या लश्कराच्या नोकरींत असतील, किंवा त्या लश्कराच्या बरोबरचें बुणगे असतील, किंवा त्या लश्कराच्या कोणत्याही भागाबरोबर असतील त्या सर्वांस,

लागू होतील असें समजावें:

मात्र असें ठरविलें आहे कीं,—

ज्या वर्गास [इंग्लंड देशाचा] सैन्याबाबदचा आक्ट लागू आहे परंतु हे आईन लागू नाहींत, अशा वर्गाचा मी आहें असें कोणताही मनुष्य ह्मणेल, तर, तो त्या वर्गाचा आहे असें शाबीत करण्याचा बोजा त्या मनुष्यावर राहील."

**१ ल्या भागाच्या (ई) रकमेच्या ऐवजीं नवीन रकम दाखल करणें.**

४. सदई आईनांच्या १ ल्या भागाच्या (ई) रकमेच्या बदला खालील मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणें :—

"(ई) व्याख्या.

"या आईनांमध्यें, विषयास किंवा संदर्भास कांहीं बाध येत नसेल तर—

(१) 'जाहिरनामा' ह्मणजे सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध केलेला जाहिरनामा समजावा:

(२) 'ठरविलेलें' ह्मणजे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं अगर या बाबतींत त्यांजकडून ज्या कोणत्याही अधिकाऱ्यास अख्त्यार देण्यांत आला असेल त्या अधिकाऱ्यानें केलेल्या कानूंवरून ठरविलेलें, असें समजावें:

(३) 'ब्रिटिश अमलदार' ह्मणजे मलिका माआझमांच्या जमिनीवरील लश्करांत सनद धारण करणारा अमलदार समजावा; मात्र या शब्दांत ऑनररी सनदी अमल्दाराचा समावेश होत नाहीं:

(४) 'एतद्देशीय अमलदार' ह्मणजे मलिका माआझमांच्या हिंदुस्थानच्या लश्करांत एतद्देशीय लोकांची कोणतीहि रांक धारण करणारा अमलदार ह्मणून ज्याला सनद मिळाली असेल किंवा तसा अमलदार ह्मणून ज्याचें नांव गॅझेटांत प्रसिद्ध केलें असेल तो अमलदार समजावा:

(५) 'अमलदार' ह्मणजे ब्रिटिश अमलदार किंवा एतद्देशीय अमलदार समजावा; मात्र त्या शब्दांत वारंट अमलदाराचा किंवा गैरसनदी अमलदाराचा समावेश होत नाहीं:

(६) 'ताब्यांतील वैद्यकीय अमलदार' ह्मणजे सीनियर हास्पिटल असिस्टंट, पहिल्या, दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्गाचा हास्पिटल असिस्टंट व सब्-हास्पिटल असिस्टंट समजावा; मात्र या शब्दांत अमलदाराचा समावेश होत नाहीं:

(७) 'वरिष्ठ अमलदार' या संज्ञेचा उपयोग हे आईन लागू असणाऱ्या मनुष्याच्या संबंधानें केला असेल तेव्हां, त्यांत वारंट अमलदाराचा, गैरसनदी अमलदाराचा व आक्टिंग गैरसनदी अमलदाराचा समावेश होतो:

(८) 'शिपाई' या शब्दांत कोणत्याही गैरसनदी अमलदाराचा व मलिका माआझमांच्या हिंदुस्थानच्या लश्कराच्या रांकींमध्यें काम करणाऱ्या कोणत्याही हत्यारबंद मनुष्याचा समावेश होतो:

(९) 'रिक्रूट' ह्मणजे कोणत्याही कोराच्या किंवा डिपार्टमेंटाच्या पटांत शिपाई ह्मणून नांव दाखल करण्यासाठीं नांव लिहून घेतलेला मनुष्य समजावा:

(१०) 'कोर' ह्मणजे एक कमाण्ड समजावी; जसें उदाहरणार्थ, स्वारांची एक पलटण, पायदळाची एक पल्टण किंवा बटालियन, तोफखान्याची एक बॅटरी व सैन्याची जी कोणतीहि इतर पृथक् तुकडी या आईनांच्या कारणांसाठीं कोर आहे असें गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं साधारण किंवा विशेष हुकुम करून ठरविलें असेल ती तुकडी; यांत आर्मी हास्पिटल कोर व ट्रान्स्पोर्ट कोर यांचाही समावेश होतो;

(११) 'डिपार्टमेंट' यांत डिपार्टमेंटच्या कोणत्याही भागाचा किंवा शाखेचा समावेश होतो:

(१२) 'लष्करी इनाम' ह्मणजे बहुत काळपर्यंत केलेल्या नोकरीबद्दल किंवा चांगल्या वर्तणुकीबद्दल कोणतीही ग्राचुइटी किंवा वर्षासन समजावें; यांत चांगल्या वर्तणुकीबद्दलच्या कोणत्याही पगाराचा किंवा पेन्शनाचा व इतर कोणत्याही द्रव्याच्या रूपानें दिलेल्या इनामाचा समावेश होतो:

(१३) 'शत्रु' यांत सर्व हत्यारबंद दंगा करणारांचा, हत्यारबंद बंडवाल्यांचा, हत्यारबंद दंगेखोरांचा व चांच्यांचा समावेश होतो:

(१४) 'मोहीम' या संज्ञेचा उपयोग हे आईन लागू असणाऱ्या मनुष्याच्या संबंधानें केलेला असेल तेव्हां तिचा अर्थ, ज्या वेळीं असा मनुष्य, शत्रूशीं लढाई करण्याच्या कामीं गुंतलेल्या, किंवा शत्रूंनीं सर्वांशीं किंवा अंशतः व्यापलेल्या देशांत अगर जागेंत लढाई करण्याच्या कामीं गुंतलेल्या, किंवा अशा देशावर अगर जागेवर कूच करून जात असलेल्या किंवा कोणत्याही परमुलुखाचा लष्करी नात्यानें कबजा धारण करणाऱ्या फौजेच्या दिमतीस असेल किंवा तशा फौजेंतील एक असामी असेल, ती वेळ असा आहे:

(१५) 'इंडिया [हिंदुस्थान]' या संज्ञेचा अर्थ, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या मार्फत किंवा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या ताब्यांतील कोणतेही गव्हर्नर इन् कौन्सिल अगर इतर अमलदार यांच्या मार्फत चालविलेल्या मलिका माआज्ञमांच्या सार्वभौमसत्तेखालील कोणत्याही राजाचा किंवा संस्थानिकाचा कोणताही मुलुक धरून ब्रिटिश इंडिया असा आहे: आणि 'ब्रिटिश इंडिया' या संज्ञेचा अर्थ, मलिका माआज्ञमांच्या राज्यांतील ज्या मुलुकांचें व जागांचें मलिका माआज्ञमांकडून गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचे मार्फत किंवा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या ताब्यांतील कोणतेही गव्हर्नर इन् कौन्सिल अगर इतर अमलदार यांच्या मार्फत त्या त्या काळीं राज्य चालविण्यांत येत असेल ते सर्व मुलुक व त्या सर्व जागा असा आहे:

(१६) 'कमाण्डचा जनरल आफिसर' या संज्ञेचा अर्थ, कमाण्डमधील फौजेचा ताबा असणारा जनरल आफिसर असा आहे: आणि कमाण्ड या संज्ञेचा अर्थ, इंडियाच्या सैन्याचे जे मुख्य भाग त्या त्या काळीं केलेले असतील त्यांपैकीं एक भाग, असा आहे;

(१७) 'कमाण्डिंग आफिसर' या संज्ञेचा उपयोग मलिका माआज्ञमांच्या फौजेच्या कोणत्याही पृथक् भागाच्या अगर कोणत्याही डिपार्टमेंटाच्या संबंधानें या आईनांच्या कोणत्याही ठरावांत केला असेल तेव्हां, तिचा अर्थ, इंडियाच्या आर्मी रेग्युलेशनांअन्वयें, किंवा असें कोणतेंही रेग्युलेशन नसेल तेव्हां लष्करी खात्याच्या रिवाजावरून, त्या फौजेच्या सदर्हू भागाच्या अगर सदर्हू डिपार्टमेंटच्या संबंधानें, त्या ठरावांत सांगितलेल्या प्रकारच्या गोष्टींच्या संबंधाचीं कमाण्डिंग आफिसराचीं कामें करणें हें ज्या अमलदाराचें कर्तव्य असेल, तो अमलदार, असा आहे:

(१८) 'लश्करी कैद' ह्मणजे लश्करी खात्याच्या रिवाजावरहुकुम कोणत्याही मनुष्यास धरणें किंवा अटकेंत ठेवणें, असें समजावें;

(१९) 'कोर्ट-मार्शल' ह्मणजे या आईनांअन्वयें भरलेलें कोर्ट-मार्शल असें समजावें;

(२०) 'फौजदारी कोर्ट' ह्मणजे ब्रिटिश इंडियांत असलेलें किंवा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून इतर ठिकाणीं स्थापन केलेलें अगर चालू ठेवलेलें साधारण फौजदारी न्यायाचें कोर्ट समजावें;

(२१) 'सिव्हिल गुन्हा' ह्मणजे जो गुन्हा ब्रिटिश इंडियांत केला असतां त्याचा इन्साफ फौजदारी कोर्टास करतां येईल असा गुन्हा समजावा;

(२२) "गुन्हा" ह्मणजे ह्या आईनांअन्वयें ज्याबद्दल शिक्षा करितां येईल असें कोणतेंही कृत्य अगर वर्तन समजावें, आणि त्यांत, ह्यांत पूर्वी व्याख्या केलेल्या सिव्हिल गुन्ह्याचा समावेश होतो; आणि

(२३) ज्या संज्ञा हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींचा कायदा ह्यांत आलेल्या असून ज्यांचा या आईनांत उपयोग केलेला असेल व ज्यांच्या व्याख्या ह्या आईनांत एन्व्हवीं दिलेल्या नसतील, त्या संज्ञांचा अर्थ त्या कायद्यांत जो केला आहे तोच आहे, असें समजावें.

१ ल्या भागाच्या (फ) रकमेच्या ऐवजीं नवीन रकम दाखल करणें.

५. सदर्हू आईनांच्या १ ल्या भागाच्या (फ) रकमेच्या बदला खालीं दिलेला मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:—

"(फ).—कित्येक कायदे कायम ठेवणें.

"क्यांटोन्मेंट माजिस्ट्रेटांचीं आणि छावण्यांतील पोलीस स्वाधीन असणाऱ्या अमलदारांचीं कामें व अधिकार हीं ज्या कोणत्याही कायद्यांत ठरवून मर्यादित केलीं असतील त्या कायद्यांस या आईनांमधील कोणत्याही ठरावावरून व्यत्यय येतो असें समजूं नये."

२ ऱ्या भागाच्या १ ल्या सदराच्या ऐवजीं नवीन सदर दाखल करणें.

६. सदर्हू आईनांच्या २ ऱ्या भागाच्या १ ल्या सदराच्या बदला खालील मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:—

"सदर १.—पटांत नांवें दाखल करणें, प्रतिज्ञा करविणें, बर्तर्फ करणें व फांटा देणें.

पटांत नांव दाखल करणें व प्रतिज्ञा करविणें.

"आईन १.—(१) कोणत्या मनुष्यांचीं किंवा कोणत्या वर्गांच्या मनुष्यांचीं नांवें फक्त पटांत दाखल करावीं अगर कोणत्या मनुष्यांचीं किंवा कोणत्या वर्गांच्या मनुष्यांचीं नांवें पटांत दाखल करून त्यांजकडून प्रतिज्ञा करवावी तें जाहिरनामा प्रसिद्ध करून ठरविण्याचा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस अधिकार आहे.

पटांत नांव दाखल करण्याची रीति.

(२) एकाद्या मनुष्याचें नांव त्याच्या अनुमतानें मलिका माआझमांच्या हिंदुस्थानच्या लश्कराच्या एकाद्या कोराच्या किंवा डिपार्टमेंटाच्या यादीवर ठरविलेल्या रीतीनें दाखल करण्यांत आलें ह्मणजे त्याचें नांव या आईनांअन्वयें पटांत दाखल केलें असें समजलें पाहिजे.

प्रतिज्ञा करविण्याची रीति.

(३) रिकूटांसंबंधीं या आईनांच्या ठरावांस अनुसरून, या आईनांअन्वयें प्रतिज्ञा करवावयाच्या प्रत्येक मनुष्यास, ठरविलेल्या सिव्हिल किंवा लश्करी अमलदारापुढें घेऊन गेलें पाहिजे, आणि त्या अमलदारानें, प्रतिज्ञेच्या ठरविलेल्या नमुन्यांत नमूद केलेले सवाल व इतर कोणत्याही गोष्टी ठरविलेल्या असल्यास त्या, त्या मनुष्यास वाचून दाखविल्या पाहिजेत व समजून दिल्या पाहिजेत अगर त्यास आपल्या समक्ष इतराकडून वाचवून

दाखविल्या पाहिजेत व समजून देवविल्या पाहिजेत; आणि, प्रतिज्ञेच्या नमुन्यांत नमूद केलेल्या कोणत्याही सवालाचा तूं खोटा जबाब दिलास तर या आईनांमध्यें ठरविल्याप्रमाणें शिक्षा होण्यास तूं पात्र होशील अशी त्यास ताकीद दिल्यानंतर, त्या अमलदारानें प्रत्येक सवालाचा जबाब लिहून घेतला पाहिजे, व त्या मनुष्यास ते सवाल पूर्णपणें समजत असून प्रत्येक सवालाचा जबाब त्या सवालाचे समोर बरोबर लिहिला आहे अशी त्या अमलदाराची खात्री झाल्यास आणि कोणताही अडथळा नाहीं असें त्यास वाटल्यास, त्यानें त्या मनुष्याकडून ठरविलेल्या नमुन्याप्रमाणें इकरार करविला पाहिजे किंवा शपथ घेवविली पाहिजे.

(४) या आईनांअन्वयें ठरविलेल्या इकराराच्या किंवा शपथेच्या नमुन्यांत, मी मलिका मआझमा व त्यांचे वारस व जायनिशी यांशीं इमानानें चालेन, आणि मलिका मआझमांच्या हिंदुस्थानच्या लष्करांत नोकरी करीन व खुष्कीनें किंवा जलमार्गानें जेथें मला जाण्याविषयीं हुकुम होईल तेथें मी जाईन, आणि माझ्यावर नेमिलेल्या कोणत्याही अमलदाराचे सर्व हुकुम मी आपले जिवाकडेही न पाहतां मानीन, असें प्रतिज्ञा करणाऱ्या मनुष्याचें वचन असलें पाहिजे.

(५) कोणताही रिक्रूट चाकरी करण्यास योग्य झाला आहे असें जाहीर झालें ह्मणजे, कमाण्डिंग आफिसरानें, त्याजकडून, ठरविलेल्या रीतीनें, कोराच्या पुढें किंवा कोराचा जेवढा भाग अगर डिपार्टमेंटाचे जितके लोक हजर असतील तेवढ्या भागापुढें अगर लोकांपुढें, सदर्हू नमुन्याप्रमाणें इकरार करविला पाहिजे किंवा शपथ घेवविली पाहिजे.

(६) इकरार करविल्यानंतर किंवा शपथ घेवविल्यानंतर, प्रतिज्ञेच्या कागदावर सदर्हू आफिसरानें त्या प्रतिज्ञेच्या खरेपणाबद्दल आपली सही केली पाहिजे ह्मणजे त्या मनुष्याची प्रतिज्ञा झाली असें मानलें जाईल.

(७) ज्या कोणत्याही कानू ठरविण्यांत येतील त्यांस अनुसरून इंडियाचे कमाण्डर इन् चीफ् हे किंवा कमाण्डचा जनरल आफिसर हा असें फर्माविण्यास मुख्त्यार आहे कीं, ज्या कोणत्याही मनुष्यांना प्रतिज्ञा झालेले मनुष्य ह्मणून हे आईन लागू असतील त्यांचीं नांवें पटांत दाखल केलेलीं आहेत असें या आईनांच्या कारणांसाठीं मानावें, व पटांत नांवें दाखल केलेले मनुष्य ह्मणून ज्या कोणत्याही मनुष्यांना हे आईन लागू असतील त्यांची प्रतिज्ञा झाली आहे असें या आईनांच्या कारणांसाठीं मानावें.

किंत्येक बाबतींत पटांत नांव दाखल करणें व प्रतिज्ञा करणें यांचा सारखाच परिणाम आहे असें समजणें.

"आईन २.—(१) [इंग्लंड देशाचा] सैन्याबाबद आक्ट याच्या ठरावांस पात्र राहून, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस, जाहिरनामा प्रसिद्ध करून, हे आईन लागू असणाऱ्या कोणत्याही वर्गाच्या मनुष्यास, या आईनांच्या कोणत्याही कारणांसाठीं, एतद्देशीय अमलदार, वारंट आफिसर किंवा गैरसनदी अमलदार मानावें ह्मणून फर्माविण्याचा अख्त्यार आहे; आणि,

दर्जा व ताबेदारी.

(२) सदरीं सांगितल्याप्रमाणें पात्र राहून, कोणत्याही ठरविलेल्या अधिकाऱ्यास अशा कोणत्याही मनुष्याच्या संबंधानें सदर्हूप्रमाणें फर्माविणारा हुकुम काढण्याचा अख्त्यार आहे.

(३) या आईनाअन्वयें काढलेला कोणताही जाहिरनामा किंवा हुकुम रद्द करण्यास, तो ज्या अधिकाऱ्यानें काढला असेल तो अधिकारी मुख्त्यार आहे; आणि,

(४) सदरीं सांगितल्याप्रमाणें पात्र राहून, सदर्हू वर्गाच्या ज्या कोणत्याही मनुष्याच्या संबंधानें असा कोणताही जाहिरनामा किंवा हुकुम अमलांत नसेल तो मनुष्य गैरसनदी अमलदाराच्या दरज्याहून कमी दरज्याचा आहे असें या आईनांच्या सर्व कारणांसाठीं, होईल तेथवर, मानलें पाहिजे.

(५) हे आईन लागू असणाऱ्या इतर कोणत्याही मनुष्याच्या दरज्याच्या संबंधानें, किंवा असा कोणताही मनुष्य कोणत्याही विवक्षित दर्ज्याच्या वरच्या दर्ज्याचा आहे किंवा त्या खालच्या दर्ज्याचा आहे यासंबंधानें कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास, त्याबद्दल गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांकडून करण्यांत येईल तो निकाल अखेरचा आहे असें समजलें पाहिजे.

(६) हे आईन लागू असलेला प्रत्येक मनुष्य, तो ज्याच्या दिमतीस आहे असें कोणतेंही कोर किंवा डिपार्टमेंट असल्यास, त्या कोराच्या किंवा डिपार्टमेंटाच्या कमाण्डिंग आफिसराच्या हाताखालीं, व तो मनुष्य कोणत्याही कोराच्या किंवा डिपार्टमेंटाच्या दिमतीस नसल्यास तो ज्या फौजेंत त्यावेळीं नोकरी करीत असेल त्या फौजेचा ताबा असणाऱ्या जनरल किंवा इतर आफिसरानें त्याचा त्या वेळेपुरता कमाण्डिंग आफिसर ह्मणून ज्या कोणत्याही अमलदारास निर्दिष्ट केलें असेल त्या अमलदाराच्या हाताखालीं, अगर इतर कोणत्याही ठरविलेल्या अमलदाराच्या हाताखालीं, किंवा, असा कोणताही अमलदार निर्दिष्ट केलेला अगर ठरविलेला नसल्यास सदर्हू ताबा असणाऱ्या जनरल अगर इतर आफिसराच्या हाताखालीं आहे असें या आईनांच्या कारणांसाठीं मानलें पाहिजेः

मात्र इतकेंच कीं, ताबा असणाऱ्या जनरल किंवा इतर आफिसरानें, कोणत्याही मनुष्यास, तो मनुष्य जेथें असेल त्या जागीं त्यास ज्याच्या हाताखालीं ठेवतां येईल असा त्याच्या दरज्याहून मोठ्या दरज्याचा कोणताही अमलदार हजर असल्यास, त्या मनुष्याच्या स्वतःच्या दरज्याहून हुद्याच्या नात्यानें कमी दरज्याच्या अमलदाराच्या हाताखालीं देऊं नये.

सनदी अमलदारांस बर्तर्फ करणें व फांटा देणें.

"आईन ३.—(१) प्रत्येक एतद्देशीय अमलदार, जनरल कोर्ट-मार्शलानें केलेल्या शिक्षेच्या ठरावानें नोकरींतून बर्तर्फ केला जाण्यास, व इंडियाचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या किंवा इंडियाचे कमाण्डर इन् चीफ यांच्या किंवा तो अमलदार ज्या कमाण्डचा असेल त्या कमाण्डच्या जनरल आफिसराच्या हुकुमानें बर्तर्फ केला जाण्यास किंवा फांटा दिला जाण्यास पात्र आहे असें समजावें.

(२) या आईनांअन्वयें बर्तर्फ करण्यांत आलेल्या एतद्देशीय अमलदाराचा पेन्शनाविषयींचा सर्व हक्क नाहींसा होईल.

इतर मनुष्यांना बर्तर्फ करणें व फांटा देणें.

"आईन ४.—(१) एतद्देशीय अमलदार खेरीजकरून हे आईन लागू असलेला प्रत्येक मनुष्य—

(अ) त्याचा इनसाफ करण्यास अधिकार असलेल्या कोणत्याही कोर्टमार्शलाच्या शिक्षेच्या ठरावानें नोकरींतून बर्तर्फ केला जाण्यास, आणि

(ब) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या, किंवा इंडियाचे कमाण्डर इन् चीफ यांच्या, किंवा तो ज्या कमाण्डचा असेल त्या कमाण्डच्या जनरल आफिसराच्या, किंवा तो ज्या डिव्हिजनांत अगर डिस्ट्रिक्टांत नोकरी करीत असेल त्या डिव्हिजनाचा अगर डिस्ट्रिक्टाचा ताबा असणाऱ्या आफिसराच्या हुकुमानें, अथवा तो कमाण्डच्या दिमतीस नसणाऱ्या फौजेंतील असामी असल्यास अशा फौजेचा ताबा असणाऱ्या अमलदाराच्या हुकुमानें, बर्तर्फ केला जाण्यास किंवा फांटा दिला जाण्यास,

पात्र आहे असें समजावें.

(२) सदर्हूप्रमाणें बर्तर्फ केलेल्या प्रत्येक मनुष्याचा पेन्शनाविषयींचा सर्व हक्क नाहींसा होईल.

"आईन ५.—(१) गैरसनदी अमलदाराच्या दरज्याच्या किंवा त्याहून कमी दरज्याच्या प्रतिज्ञा केलेल्या ज्या कोणत्याही मनुष्यास नोकरींतून बर्तर्फ केलें असून किंवा फांटा दिला असून जो पुढें आपणास बर्तर्फ केल्याची किंवा फांटा दिल्याची गोष्ट कळविल्यावांचून, अगर बर्तर्फीचें किंवा फांटा मिळाल्याचें आपलें सर्टिफिकेट दाखविल्यावांचून पुनः नोकरीस राहील, त्या प्रत्येक मनुष्यास नोकरींतून बर्तर्फ करण्याचा अधिकार, तो ज्या कोरांत किंवा डिपार्टमेंटांत नोकरी करीत असेल त्या कोराचा किंवा डिपार्टमेंटाचा ताबा असणाऱ्या अमलदारास आहे.

प्रतिज्ञा केलेल्या मनुष्यास बर्तर्फ केला असून किंवा फांटा दिला असून तो पुनः चाकरीस राहील किंवा प्रतिज्ञा करणारा मनुष्य आपल्या प्रतिज्ञेच्या वेळीं खोटा जबाब देईल तर.

(२) गैरसनदी अमलदाराच्या दरज्याच्या किंवा त्याहून कमी दरज्याच्या प्रतिज्ञा केलेल्या ज्या कोणत्याही मनुष्यानें, तो प्रतिज्ञा करण्याच्या कारणासाठीं ज्या अमलदारापुढें हजर झाला असेल त्या अमलदाराकडून किंवा त्या अमलदाराच्या हुकुमावरून त्यास मिळालेल्या प्रतिज्ञेच्या कागदांतील कोणत्याही सवालास बुद्ध्या खोटा जबाब दिला आहे असें आढळून येईल तो प्रत्येक मनुष्य, कोर्टमार्शलानें त्यावर गुन्ह्याच्या शाबितीचा ठराव केला असतां, कैदेची शिक्षा (सक्त मजुरीनिशीं व एकांत कैदेनिशीं किंवा तशा कैदेवांचून) किंवा त्याहून या आईनांमध्यें सांगितली असेल ती कमी शिक्षा भोगण्यास पात्र होईल.

"आईन ६.—प्रतिज्ञा केलेल्या ज्या ज्या मनुष्यास नोकरींतून बर्तर्फ केलें असेल किंवा फांटा दिला असेल त्या प्रत्येक मनुष्यास त्याच्या कमाण्डिंग आफिसरानें इंग्रेजी भाषेंत व (त्या मनुष्याची जन्मभाषा इंग्रेजी नसेल तेव्हां) त्याच्या जन्मभाषेंत एक सर्टिफिकेट दिलें पाहिजे; त्या सर्टिफिकेटांत खालील माहिती असली पाहिजेः—

बर्तर्फ केलेल्या किंवा फांटा दिलेल्या मनुष्यास सर्टिफिकेट.

(अ) त्यास बर्तर्फ करणारा किंवा फांटा देणारा अधिकारी कोणता तें;

(ब) त्यास बर्तर्फ करण्याचें किंवा फांटा देण्याचें कारण कोणतें तें; आणि

(क) लष्करांतील त्याच्या नोकरीची एकंदर मुदत किती ती."

७. सदर्हू आईनांपैकीं ७ व्या आईनाच्या १ ल्या वाक्यांतील "कोणतेही पलटणींत किंवा कोरांत किंवा डिव्याचमेंटांत किंवा गार्डांत" हे शब्द यावरून रद्द केले आहेत.

७ व्या आईनाचा कांहीं भाग रद्द करणें.

८. सदरीं शेवटीं सांगितलेल्या आईनाच्या तिसऱ्या वाक्याच्या ऐवजीं खालील मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणेंः—

त्याच आईनाच्या तिसऱ्या वाक्याच्या ऐवजीं नवीन वाक्य दाखल करणें.

"अथवा ज्यास कोणताही दंगा अगर फिसाद झाला आहे अशी किंवा दंगा करण्याचा अगर फिसाद उपस्थित करण्याचा इरादा झाला आहे अशी किंवा सरकाराविरुद्ध कोणताही मिलाफ झाला आहे अशी माहिती असून किंवा तसें मानण्यास आधार असून,".

९. सदर्हू आईनांपैकीं ८ व्या आईनांत, "व आपला वरिष्ठ अमलदार कोणतेही रीतीनें ओळखतां येई असे प्रसंगीं त्यावर" या शब्दांच्या बदला "आपल्या वरिष्ठ अमलदारावर, तो आपला वरिष्ठ अमलदार आहे असें जाणून किंवा तसें मानण्यास आधार असून" हे शब्द दाखल करावे.

८ व्या आईनाची सुधारणा.

१०. सदर्हू आईनांपैकीं १० व्या व ११ व्या आईनांच्या बदला खालील आईन दाखल करावे, ते येणेंप्रमाणेंः—

१० व्या व ११ व्या आईनांच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

"चाकरी सोडून पळून जाणें.

आईन १०.—जो चाकरी सोडून पळून जाईल किंवा चाकरी सोडून पळून जाण्याचा प्रयत्न करील;—अथवा

"फांटा मिळाल्यावांचून पुनः चाकरीस राहणें.

"आईन ११.--जो ज्या कोरांतला किंवा डिपार्टमेंटांतला असेल त्या कोरांतून किंवा डिपार्टमेंटांतून पहिल्यानें शिरस्त्याप्रमाणें फांटा मिळाल्यावांचून इतर कोणत्याही कोरांत किंवा डिपार्टमेंटांत चाकरीस राहील;-अथवा".

२४ व्या आईनाची सुधारणा.

११. सदर्हू आईनांपैकीं २४ व्या आईनाच्या शेवटल्या पारिग्राफाच्या बदला खालील मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:--

"जेव्हां कोणत्याही मनुष्यावर, ७ व्या आईनांत निर्दिष्ट केलेला व या आईनाअन्वयें मरणाची शिक्षा करण्यायोग्य गुन्हा केल्याच्या शाबितीचा ठराव होईल तेव्हां त्याचा सर्व स्थावर व जंगम माल सरकारदाखल होईल."

२५ व्या व २६ व्या आईनाच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

१२. सदर्हू आईनांपैकीं २५ व्या व २६ व्या आईनांच्या बदला खालील आईन दाखल करावे, ते येणेंप्रमाणें:--

"अयोग्य वर्तणूक.

"आईन २५.—जो कोणताही अमलदार, ताब्यांतील वैद्यकीय अमलदार, किंवा वारंट आफिसर आपल्या हुद्यास व अब्रूस अयोग्य अशा रीतीनें वर्तणूक करील;--आणि

"ड्यूटीवर असतां कैफ वगैरे करून मस्त होणें.

"आईन २६.—हे आईन लागू असणारा जो कोणताही मनुष्य —

कोणत्याही ड्यूटीवर असतां किंवा ड्यूटीवर जाण्याची ताकीद दिल्यानंतर, अगर परेडीवर असतां अगर कूच करीत असतां कैफ वगैरे करून मस्त झालेला असेल;--अथवा".

३१ व्या आईनाच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

१३. सदर्हू आईनांपैकीं ३१ व्या आईनाच्या बदला खालील आईन दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:—

"परत दाखल होण्यास चुकणें.

"आईन ३१.—जो, रजेवर असतां, आपल्या कोरास किंवा डिपार्टमेंटास कामगिरीवर जाण्याचा हुकुम झाला आहे अशी बातमी योग्य अधिकाऱ्याकडून पोंहचल्यावर, पुरतें कारणावांचून, विलंब न लावतां आपल्या कामावर परत दाखल होण्यास चुकेल; —अथवा".

३९ व्या आईनाच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

१४. सदर्हू आईनांपैकीं ३९व्या आईनाच्या बदला खालील आईन दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:—

"प्रोवोस्ट मार्शलास हरकत करणें.

"आईन ३९.—जो, प्रोवोस्ट मार्शलास किंवा असिस्टंट प्रोवोस्ट मार्शलास किंवा प्रोवोस्ट मार्शलाचे हाताखालीं अगर त्याच्या वतीनें कायदेशीर रीतीनें अधिकार चालविणाऱ्या कोणत्याही अमलदारास अगर गैरसनदी अमलदारास अगर इतर मनुष्यास हरकत करील, अथवा तो प्रोवोस्ट मार्शल, असिस्टंट प्रोवोस्ट मार्शल, किंवा कोणताही सदर्हू प्रकारचा अमलदार, गैरसनदी अमलदार किंवा इतर मनुष्य आपलें काम करण्यांत मदत मागेल तेव्हां त्यास मदत करण्यास नाकारील;—अथवा".

४० व्या आईनाची सुधारणा.

१५. सदर्हू आईनांपैकीं ४० व्या आईनांत "या आईनाअन्वयें" व "प्रतिज्ञा केलेला" या शब्दांच्या दरमियान "पटांत नांव दाखल केलेला किंवा" हे शब्द दाखल करावे.

४७ व्या आईनाच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

१६. सदर्हू आईनांपैकीं ४७ व्या आईनाच्या बदला खालील आईन दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:—

"पलटणीसंबंधी जरूरीचे सामानाची वाट लावणें.

"आईन ४७.—जो—

(अ) बुद्धया किंवा हयगयीनें आपल्या घोड्यास ठार मारील, इजा करील, लांबवील किंवा हरवील अगर सरकारच्या नोकरींत वापरण्यांत येत असलेल्या कोणत्याही जनावरास वाईट रीतीनें वागवील;—अथवा

(ब) आपलीं शस्त्रें, कपडे, हत्यारें, वाद्यें, शस्त्रवैद्यकीचीं हत्यारें, सरंजाम, युद्धसामग्री, शिपायगिरीचे कपडे वगैरे सामान किंवा पलटणीसंबंधी जरूरीच्या वस्तु, अगर त्याचे स्वाधीन केले असतील किंवा इतर कोणत्याहि मनुष्याचे असतील असे सदहू प्रकारचे कोणतेही जिन्नस लबाडीनें किंवा कपटानें नेईल अगर लपवील अगर कोणत्याही मनुष्यास देईल, किंवा बुद्धया किंवा हयगयीनें त्यांस नुकसान करील अगर हरवील; —अथवा

(क) लढाईंत चाकरी बजाविल्याबद्दल किंवा साधारण चांगल्या वर्तणुकी, बद्दल मलिका माआझमांच्या किंवा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून त्यास दिलेला कोणताहि चांद किंवा अलंकार विकील, गहाण ठेवील, किंवा त्याचा नाश करील अगर त्यास छिन्नभिन्न करील;—अथवा".

१७. सदहू आईनांपैकीं ५७ व्या आईनाच्या बदला खालील आईन दाखल करावा तो येणेंप्रमाणें :— ५७ व्या आईनाच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

"आईन ५४, ५५ व ५६ यांत सांगितलेल्या गुन्ह्यांबद्दल शिक्षा.

"आईन ५७.—त्यावर जनरल कोर्ट-मार्शलानें गुन्ह्याच्या शाबितीचा ठराव केल्यास त्यास चाकरींतून बर्तर्फ करण्याच्या व बर्तर्फ करतेवेळीं त्याच्या पगाराचा व नेमणुकांचा जो कोणताही ऐवज बाकी निघत असेल त्यावरील त्याचा दावा रद्द करण्याच्या शिक्षेचा ठराव करावा, आणि तो (सक्त मजुरीनिशीं किंवा सक्त मजुरीवांचून व एकांत कैदेनिशीं किंवा तशा कैदेवांचून) पराकाष्टा दोन वर्षेंपर्यंत कैदेच्या शिक्षेसही पात्र होईलः आणि त्यावर डिस्ट्रिक्ट कोर्टमार्शलानें गुन्ह्याच्या शाबितीचा ठराव केल्यास, अशा कोर्टास ज्या शिक्षा करण्याचा अधिकार आहे त्यांपैकीं कोणत्याही किंवा सर्व शिक्षांस तो पात्र होईल".

१८. सदहू आईनांपैकीं ६५ व्या आईनांतील "इतर" हा शब्द गाळावा. ६५ व्या आईनाची सुधारणा.

१९. सदहू आईनांपैकीं ६६ व्या आईनाच्या बदला खालील आईन दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:— ६६ व्या आईनाच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

"आईन ५८ ते ६५ यांत सांगितलेल्या गुन्ह्यांबद्दल शिक्षा.

"आईन ६६.—त्यावर जनरल किंवा डिस्ट्रिक्ट कोर्ट-मार्शलानें अपराधाच्या शाबितीचा ठराव केल्यास, मरणाची किंवा काळ्या पाण्याची शिक्षा खेरीज करून इतर ज्या शिक्षा करण्याचा अधिकार अशा कोर्टास असेल त्यांपैकीं कोणत्याही किंवा सर्व शिक्षांस तो पात्र होईल."

२०. सदहू आईनांपैकीं ६९ व्या आईनांत "गुन्हा ठरविणारे कोर्टास या आईनावरून जी शिक्षा ठरविण्याचा अधिकार असेल त्या शिक्षेस तो पात्र होईल" या शब्दांच्या बदला, "त्या कोर्टमार्शलास मरणाची किंवा काळ्या पाण्याची शिक्षा खेरीज करून ज्या ६९ व्या आईनाची सुधारणा.

इतर शिक्षा ठरविण्याचा अधिकार असेल त्यांपैकीं कोणत्याही किंवा सर्व शिक्षांस तो पात्र होईल. " हे शब्द दाखल करावे.

७१ व्या आईनाच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

२१. सदर्हू आईनांपैकीं ७१ व्या आईनाच्या बदला खालील आईन दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:--

"साह्य.

"आईन ७१.—जो जो मनुष्य या आईनांअन्वयें शिक्षा करण्यायोग्य असा कोणताही गुन्हा करण्यास, हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींचा कायदा याच्या अर्थाप्रमाणें साह्य करील, त्या प्रत्येक मनुष्यास तशा गुन्ह्याबद्दल या आईनांमध्यें मागें ठरविलेली शिक्षा करण्याचा अधिकार आहे."

७२ व्या आईनाच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

२२. सदर्हू आईनांपैकीं आईन ७२ ह्याच्याबदला खालील आईन दाखल करावा, तो येणेंप्रमाणें :—

कोर्ट-मार्शलें व त्यांचे प्रकार.

"आईन ७२.—या आईनांच्या कारणांसाठीं पांच प्रकारचीं कोर्ट-मार्शलें ठरविलीं आहेत, ह्मणजे :—

| | |
|---|---|
| (१) जनरल कोर्ट-मार्शलें.<br>(२) डिस्ट्रिक्ट कोर्ट-मार्शलें.<br>(३) रेजिमेंटल कोर्ट-मार्शलें. | यांस यांत पुढें आर्डिनरी कोर्ट-मार्शलें ह्मटलें आहे. |
| (४) समरी जनरल कोर्ट-मार्शलें.<br>(५) समरी कोर्ट-मार्शलें. | यांस यांत पुढें एक्स्ट्रॆआर्डिनरी कोर्ट-मार्शलें ह्मटलें आहे " |

आईन ७३ व ७४ ह्यांच्याबदला नवीन आईन दाखल करणें.

२३. सदर्हू आईनांपैकीं आईन ७३ व ७४ ह्यांच्या बदला खालील आईन दाखल करावे, ते येणेंप्रमाणें :—

"आर्डिनरी कोर्ट-मार्शलें."

आर्डिनरी कोर्ट-मार्शलें भरविण्याचा अधिकार.

" आईन ७३.—(१) जनरल किंवा डिस्ट्रिक्ट कोर्ट-मार्शलें भरविण्याचा अधिकार खालीं सांगितलेल्या अधिकाऱ्यांस आहे असें समजावें, ह्मणजे:—

(अ) इंडियाचे कमाण्डर इन् चीफ यांस,

(ब) कमाण्डचा जनरल आफिसर यास,

(क) इंडियाचे कमाण्डर इन् चीफ यांच्या किंवा कमाण्डचा जनरल आफिसर याच्या वारंटावरून या बाबतींत ज्या कोणत्याही अमलदारास अधिकार मिळाला असेल त्या अमलदारास.

(२) जनरल किंवा डिस्ट्रिक्ट कोर्ट-मार्शलें भरविण्याचा अधिकार रकम (१), पोट-रकम (क) याअन्वयें देणें तो, इंडियाचे कमाण्डर इन् चीफ यांस किंवा तसा अधिकार देणारा कमाण्डचा जनरल आफिसर यास योग्य वाटतील त्या अटींस, निर्बंधास, अपवादांस व शर्तीस पात्र करून दिला पाहिजे.

(३) जनरल किंवा डिस्ट्रिक्ट कोर्ट-मार्शलें अगर दोन्हीं प्रकारचीं कोर्ट-मार्शलें भरविण्याबद्दलचें या आईनाअन्वयें कोणतेंही वारंट एकाद्या अमलदारास पाठविणें तें त्या अमलदाराच्या नांवानें किंवा त्याच्या हुद्याच्या नांवानें, अगर अंशतः त्याच्या नांवानें व अंशतः त्याच्या हुद्याच्या नांवानें पाठविण्याचा अधिकार आहे, आणि त्यांतील शर्तींप्रमाणें व तें ज्या रीतीनें पाठविलें असेल त्या रीतीप्रमाणें त्यांत नांव लिहिलेल्या अमलदारास मात्र तें लागू करण्याचा किंवा न करण्याचा, किंवा अशा अमलदारांचीं कामें त्या काळीं करणाऱ्या मनुष्यासही किंवा अशा अमलदाराच्या

कमाण्डचा हुद्दा प्राप्त झालेल्या त्यांच्या स्थानापन्नांसही लागू करण्याचा किंवा न करण्याचा अधिकार आहे.

" आईन ७४.—जनरल कोर्ट-मार्शल ब्रिटिश इंडियांत भरल्यास त्यांत निदान सात तरी अमलदार असले पाहिजेत; मात्र सरकारी कामाकडे योग्य लक्ष्य देतां तितके अमलदार मिळण्याजोगे नसतील त्या प्रसंगीं त्या कोर्टांत निदान पांच तरी अमलदार असले पाहिजेत." जनरल कोर्ट-मार्शलांची रचना.

२४. सदर्हू आईनांपैकीं आईन ७५, ७७, ७८ व ७९ हे यावरून रद्द केले आहेत. आईन ७५,७७,७८व७९ रद्द करणें.

२५. सदर्हू आईनांपैकीं ७६ व्या आईनांत, "दरज्या कमी करून शिपाई करण्याची शिक्षा" या शब्दांच्या बदला "दरज्या कमी करून खालच्या पायरीच्या दरज्यावर घालण्याची किंवा शिपाई करण्याची शिक्षा," हे शब्द दाखल करावे. ७६ व्या आईनाची सुधारणा.

२६. सदर्हू आईनांपैकीं आईन ८० व ८१ ह्यांच्या बदला खालील आईन दाखल करावे, ते येणेंप्रमाणें :— आईन ८० व ८१ ह्यांच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

" आईन ८०.—डिस्ट्रिक्ट कोर्ट-मार्शलांत निदान पांच तरी अमलदार असले पाहिजेत; मात्र सरकारी कामाकडे योग्य लक्ष्य देतां तितके अमलदार मिळण्याजोगे नसतील त्या प्रसंगीं त्या कोर्टांत निदान तीन तरी अमलदार असले पाहिजेत. डिस्ट्रिक्ट कोर्ट-मार्शलांची रचना.

"आईन ८१.—डिस्ट्रिक्ट कोर्ट-मार्शलांतले सर्व अमलदार, जरूर असेल तेव्हां, आरोप आलेला मनुष्य ज्या कोराचा किंवा डिपार्टमेंटाचा असेल त्या कोराचे किंवा डिपार्टमेंटाचे असण्यास हरकत नाहीं."

२७. सदर्हू आईनांपैकीं ८२ व्या आईनांत, " दंग्याखेरीज ज्या इतर गुन्ह्याबद्दल " या शब्दांच्या बदला " ज्या गुन्ह्यांबद्दल " हे शब्द, आणि " डिस्ट्रिक्ट किंवा ग्यारिसन " व "ग्यारिसन किंवा डिस्ट्रिक्ट " या शब्दांच्या बदला " डिस्ट्रिक्ट " हा शब्द दाखल करावा. ८२ व्या आईनाची सुधारणा.

२८. सदरीं शेवटीं सांगितलेल्या आईनांत, "पराकाष्ठा एक वर्षाचे कैदेची" या शब्दांच्या बदला "पराकाष्ठा दोन वर्षांच्या कैदेची" हे शब्द, आणि "दरज्या कमी करून शिपाई करायाची शिक्षा" या शब्दांच्या बदला "दरज्या कमी करून खालच्या पायरीच्या दरज्यावर घालण्याची किंवा शिपाई करण्याची शिक्षा," हे शब्द दाखल करावे. त्याच आईनाची आणखी सुधारणा.

२९. सदर्हू आईनांपैकीं ८२ व्या आईनानंतर खालीं लिहिलेला आईन दाखल करावा, तो येणेंप्रमाणें :— ८२ व्या आईनाच्या नंतर नवीन आईन दाखल करणें.

"आईन ८२ अ.—जेव्हां, जनरल किंवा डिस्ट्रिक्ट कोर्ट-मार्शलांत ७४ व्या किंवा ८० व्या आईनांत निर्दिष्ट केलेल्या अमलदारांच्या संख्यांपैकीं लहान संख्या असावी असा हुकुम करण्यांत येईल, तेव्हां, असें कोर्ट भरविण्याविषयींच्या हुकुमांत, सरकारी कामाकडे योग्य लक्ष्य देतां सदर्हू आईनांत सांगितलेली अमलदारांची मोठी संख्या मिळण्याजोगी नाहीं असें स्पष्ट लिहिलें पाहिजे; आणि तो लिहिलेला मजकूर त्याप्रमाणें लिहिलेल्या गोष्टीचा निरुत्तर पुरावा होय असें समजावें." [कोर्ट-मार्शल] भरविण्याविषयींच्या हुकुमांत, जास्त अमलदार मिळण्याजोगे नसल्यास, तसें लिहिलें असलें पाहिजे.

३०. सदर्हू आईनांपैकीं आईन ८३, ८४ व ८५ ह्यांच्या बदला खालील आईन दाखल करावे, ते येणेंप्रमाणें :— आईन ८३, ८४ व ८५ ह्यांच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

"८३. कोणत्याही कोराचा अगर डिपार्टमेंटाचा किंवा कोणत्याही कोराच्या अगर डिपार्टमेंटाच्या कोणत्याही डिट्याचमेंटचा ताबा असणाऱ्या अमलदारास अगर दोन किंवा रेजिमेंटल कोर्ट-मार्शलची नेमणूक.

अधिक कोरांची अगर डिपार्टमेंटांची अगर दोन किंवा अधिक कोरांच्या अगर डिपार्टमेंटांच्या डिव्याचमेंटांची कमांड असणाऱ्या अमलदारास रेजिमेंटल कोर्ट-मार्शल नेमण्याचा अखत्यार आहे.

रेजिमेंटल कोर्ट-मार्शलाची रचना.

"आईन ८४.—रेजिमेंटल कोर्ट-मार्शलांत निदान तीन तरी अमलदार असले पाहिजेत.

अशा कोर्टाचे अधिकार.

"आईन ८५.—रेजिमेंटल कोर्ट-मार्शलास, हे आईन लागू असणाऱ्या व गैरसनदी अमलदाराच्या दरज्याहून वरच्या दरज्यांचे नाहींत अशा सर्व मनुष्यांचा—

(अ) आईन ७ ते २३ (दोन्ही धरून), आईन ५४ ते ६१ (दोन्ही धरून) किंवा आईन १७१ ते १७३ (दोन्ही धरून) यांअन्वयें शिक्षा करण्याजोगे गुन्हे खेरीज करून या आईनांअन्वयें कोर्टमार्शलानें इन्साफ करण्याजोग्या इतर कोणत्याही गुन्ह्याबद्दल, आणि

(ब) ठरविलेल्या अधिकाऱ्याची पूर्वी मंजुरी घेऊन, सदरीं ज्या गुन्ह्यांच्या संबंधानें अपवाद ठरविला आहे त्यांतून कोणत्याही गुन्ह्याबद्दल,

इन्साफ करण्याचा अधिकार आहे.

अशा कोर्टाचे शिक्षा देण्याचे अधिकार.

"आईन ८५ अ.—एकाद्या गुन्ह्याबद्दल दरज्या, पगार व नेमणुका महकूब करण्याची शिक्षा खेरीजकरून जी कोणतीही इतर शिक्षा करण्याचा डिस्ट्रिक्ट कोर्ट-मार्शलास अधिकार आहे ती शिक्षा तशा अपराधाबद्दल करण्याचा अधिकार रेजिमेंटल कोर्ट-मार्शलास आहे;

मात्र इतकेंच कीं, रेजिमेंटल कोर्ट-मार्शलानें, कोणतीही साहा महिन्यांहून अधिक मुदतीपर्यंतच्या कैदेची शिक्षा, किंवा १३९ व्या आईनांत ज्या आणखी शिक्षा निर्दिष्ट केल्या आहेत त्यांपैकीं कोणतीही शिक्षा देऊं नये.

आईन ८६ ते ८९ ह्यांच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

३१. सदहू आईनांपैकीं आईन ८६ ते ८९ (दोन्ही धरून) ह्यांच्या बदला खालील आईन दाखल करावे, ते येणेंप्रमाणें:—

एतद्देशीय व ब्रिटिश अमलदारांना केव्हां नेमावें तें.

"आईन ८६.—(१) सदरील ठरावांअन्वयें भरविलेल्या कोर्ट-मार्शलांत जे अमलदार असावयाचे ते, यांत पुढें ठरविले आहेत ते प्रसंग खेरीज करून इतर सर्व प्रसंगीं, एतद्देशीय अमलदार असले पाहिजेत.

(२) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल, किंवा इंडियाचे कमाण्डर इन् चीफ, किंवा कमाण्डचा जनरल आफिसर, यांस, अगर इंडियाचे कमाण्डर इन् चीफ यांकडून किंवा कमाण्डचा जनरल आफिसर याकडून ह्या बाबतींत वारंटाअन्वयें अधिकार मिळालेल्या कोणत्याही अमलदारास, या आईनांअन्वयें भरविलेल्या कोणत्याही कोर्ट-मार्शलांत एतद्देशीय अमलदारांच्या बदला ब्रिटिश अमलदार असावे असें फर्माविण्याचा अधिकार आहे.

(३) हे आईन लागू असलेल्या ज्या कोणत्याहीं मनुष्याचा कोर्ट मार्शलाकडून इन्साफ होण्याविषयीं हुकुम झाला असेल त्या मनुष्यास, आपला इन्साफ ब्रिटिश अमलदारांकडून व्हावा असें मागण्याचा अधिकार आहे.

(४) अशी मागणी करण्याचा हक्क, ज्या कोणत्याही मनुष्याचा इन्साफ होण्याविषयीं हुकुम झालेला असेल त्या प्रत्येक मनुष्यास कमाण्डिंग आफिसरानें, कोर्ट भरविण्याच्या पूर्वी समजून दिला पाहिजे, किंवा हें काम कमाण्डिंग आफिसर ज्या कोणा अमलदाराकडे सोंपवील त्या अमलदारानें समजून दिला पाहिजे; आणि तशी मागणी करण्यांत आली तर कोर्टाची रचना त्याप्रमाणें केली पाहिजे.

(९) हे आईन लागू असणाऱ्या व कोणत्याही ब्रिटिश कोरांत किंवा डिट्याचमेंटांत नोकरी करणाऱ्या कोणत्याही मनुष्याचा इन्साफ करण्यासाठीं भरवावयाच्या कोर्ट-मार्शलाचे सर्व मेंबर, सरकारी कामाकडे योग्य लक्ष्य देतां एतद्देशीय अमलदार त्या कोर्टांत काम करण्यासाठीं मिळण्याजोगे नाहींत असा तें कोर्ट भरणाऱ्या अमलदाराचा अभिप्राय असल्यास (हा अभिप्राय कोर्ट भरविण्याविषयींच्या हुकुमांत स्पष्टपणें लिहिला पाहिजे व तो निश्चयात्मक असेल), ब्रिटिश अमलदार असण्यास हरकत नाहीं.

"आईन ८७.—(१) प्रत्येक जनरल कोर्ट-मार्शलाचें काम चालवयाच्या वेळीं एक जज्ज आड्व्होकेट हजर असला पाहिजे.

जज्ज आड्व्होकेट, आणि एतद्देशीय कोर्ट-मार्शलासाठीं सुपरिंटेंडिंग आफिसराची नेमणूक.

(२) जज्ज आड्व्होकेट जनरलाच्या खात्याचा कोणी अमलदार मिळण्याजोगा नसल्यास, कोर्ट भरविणाऱ्या अमलदारानें इन्साफाच्या वेळीं जज्ज आड्व्होकेटाचें काम करण्यासाठीं एकाद्या योग्य मनुष्यास नेमलें पाहिजे.

(३) कोणत्याही कोर्ट-मार्शलाकडून ज्याचा इन्साफ होण्याविषयीं हुकुम झाला असेल किंवा इन्साफ होत असेल अशा कोणत्याही मनुष्यास, जज्ज आड्व्होकेटाचें काम करणाऱ्या किंवा जज्ज आड्व्होकेट ह्मणून काम करणाऱ्या कोणत्याही मनुष्याच्या संबंधानें, कोर्टाच्या परवानगीवांचून, हरकत घेण्याचा अधिकार नाहीं.

(४) ज्यांत सर्व मेंबर एतद्देशीय अमलदार असून ज्यांत जज्ज आड्व्होकेट हजर नसेल त्या प्रत्येक कोर्ट-मार्शलानें चालविलेल्या कामावर देखरेख ठेवण्यासाठीं, ज्याची नोकरी चार वर्षांहून कमी झालेली नाहीं असा एक ब्रिटिश अमलदार नेमला पाहिजे; या अमलदारास यांत पुढें सुपरिंटेंडिंग आफिसर असें ह्मटलें आहे.

"आईन ८८.—(१) प्रत्येक कोर्ट-मार्शलाच्या वेळीं, जो अमलदार सीनियर असेल त्यानें, त्याची प्रेसिडेंट ह्मणून मुद्दाम नेमणूक करण्यांत आली नसली तरी, प्रेसिडेंट झालें पाहिजे.

प्रेसिडेंट.

(२) प्रेसिडेंट मरण पावल्यास किंवा निरुपायाचे अडचणीमुळें गैरहजीर राहिल्यास, त्याच्या लगत खालच्या सीनियर अमलदारानें, त्याची प्रेसिडेंट ह्मणून मुद्दाम नेमणूक करण्यांत आली नाहीं तरी, प्रसिडेंट झालें पाहिजे, आणि कोर्टांत कमींत कमी जेवढे अमलदार असणें या आईनांवरून जरूर असेल तितक्या अमलदारांहून कमी अमलदार त्या कोर्टांत नसतील तर, इन्साफाचें काम पुढें चालू ठेविलें पाहिजे.

"आईन ८९.—जनरल, डिस्ट्रिक्ट किंवा रेजिमेंटल कोर्ट-मार्शलाचा कोणताही ठराव (फाइंडिंग) किंवा शिक्षेचा ठराव, या आईनांमध्यें ठरविलें आहे त्याप्रमाणें बहाल केला जाईल तेथवर कायदेशीर समजावा, इतर बाबतींत कायदेशीर समजूं नये.

ठराव (फाइंडिंग) व शिक्षेचा ठराव बहालीवांचून कायदेशीर नाहीं.

"आईन ८९ अ.—(१) जनरल व डिस्ट्रिक्ट कोर्ट-मार्शलांचे ठराव व शिक्षेचे ठराव बहाल करण्याचा अधिकार खालीं सांगितलेल्या अधिकाऱ्यांस आहे, ते अधिकारी येणेंप्रमाणें :—

ठराव व शिक्षेचा ठराव बहाल करण्याचा किंवा इतर प्रकारें त्याचा निकाल करण्याचा कोणास अधिकार आहे.

(अ) इंडियाचे कमाण्डर इन् चीफ;

(ब) कमाण्डऱ्या जनरल आफिसराच्या ताब्यांतील फौजेच्या संबंधानें तो जनरल आफिसर; मग त्या फौजेचें ठाणें कोठेंही असलें तरी हरकत नाहीं;

(क) कोणत्याही कमाण्डच्या दिमतीस नसलेल्या फौजेचा ताबा असणारा अमलदार;

(ड) इंडियाचे कमाण्डर इन् चीफ् यांच्या किंवा कमाण्डचा जनरल आफिसर याच्या वारंटावरून या बाबतींत अधिकार मिळालेला कोणताही अमलदार :

मात्र इतकेंच कीं, मोहिमीचा प्रसंग किंवा इंडियाच्या हद्दींबाहेरील प्रसंग खेरीज करून, एकाद्या अमलदाराच्या, ताब्यांतील वैद्यकीय अमलदाराच्या किंवा वारंट आफिसराच्या बाबतींत केलेला कोणताही ठराव किंवा शिक्षेचा ठराव, अगर कोणत्याही बाबतींत झालेला मरणाच्या, काळ्या पाण्याच्या किंवा सात वर्षांहून ज्यास्त मुदतीच्या कैदेच्या शिक्षेचा ठराव बहाल करण्याचा अधिकार या आईनाअन्वयें काढलेल्या कोणत्याही वारंटावरून कोणत्याही अमलदारास प्राप्त होतो असें समजूं नये.

(२) आईन ७३, रकमा (२) व (३) यांतील ठराव, जरूर असतील त्या फेरफारांनिशीं, या आईनाअन्वयें काढलेल्या वारंटांस लागू आहेत असें समजावें.

(३) रेजिमेंटल कोर्ट-मार्शल भरविणाऱ्या अमलदारास किंवा तसें कोर्ट-मार्शल भरविण्याचा अख्त्यार असलेल्या अमलदारास, त्या कोर्ट-मार्शलाचा ठराव व शिक्षेचा ठराव सादर झाल्याच्या तारखेरोजीं, ते बहाल करण्याचा अधिकार आहे असें समजावें.

बहाल करणाऱ्या अमलदाराचा शिक्षा कमी करण्याचा, माफ करण्याचा किंवा बदलून दुसरी शिक्षा देण्याचा अधिकार.

"आईन ८९ ब.—सदरील शेवटल्या आईनाअन्वयें काढलेल्या कोणत्याही वारंटांत ज्या अटी दिलेल्या असतील त्यांस अनुसरून, बहाल करणारा अमलदार, कोणत्याही कोर्ट-मार्शलनें केलेला शिक्षेचा ठराव बहाल करतेवेळीं, त्यांत ठरविलेली शिक्षा कमी करण्यास किंवा माफ करण्यास अगर ती शिक्षा बदलून, जी कोणतीही किंवा ज्या कोणत्याही कमी शिक्षा त्या कोर्ट-मार्शलास त्या गुन्हेगाराला देतां आल्या असत्या ती किंवा त्या कमी शिक्षा देण्यास मुख्त्यार आहे :

मात्र इतकेंच कीं, काळ्या पाण्याची शिक्षा बदलून तिच्या ऐवजीं, कोर्टानें ठरविलेल्या काळ्या पाण्याच्या शिक्षेच्या मुदतीहून अधिक मुदतीची कैदेची शिक्षा देतां कामा नये."

आईन ९० ते ९७ यांच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

३२. सदहू आईनांपैकीं आईन ९० ते ९७ (दोन्ही धरून) यांच्या बदला खालील आईन दाखल करावे, ते येणेंप्रमाणें :—

"एक्स्ट्रॉऑर्डिनरी कोर्टमार्शलें.

समरी जनरल कोर्टमार्शलें भरविण्याबाबद.

"आईन ९०.—खालील अधिकाऱ्यांस समरी जनरल कोर्टमार्शल भरविण्याचा अख्त्यार असून, असें कोर्टमार्शल—

(अ) ब्रिटिश इंडियाच्या आंतील किंवा बाहेरील कोणत्याही जागीं, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या किंवा इंडियाचे कमांडर-इन्-चीफ् यांच्या किंवा कमांडचा जनरल आफिसर याच्या हुकुमावरून याबाबतींत अधिकार मिळालेल्या कोणत्याही अमलदारास,

(ब) जेव्हां मलिका माआझमांच्या सैन्यापैकीं मोहिमींत असणाऱ्या कोणत्याही सुट्या तुकडीचा ताबा असणाऱ्या अमलदाराला, बंदोबस्ताकडे व सरकारी कामाच्या गरजांकडे योग्य लक्ष पुरवून, गुन्ह्याचा इन्साफ ऑर्डिनरी जनरल कोर्टमार्शलाकडून होणें शक्य नाहीं असें वाटेल, तेव्हां अशा अमलदारास,

भरवितां येईल.

समरी जनरल कोर्टमार्शलांची रचना.

"आईन ९१.—(१) समरी जनरल कोर्टमार्शलांत तीन पेक्षां कमी अमलदार असतां कामा नयेत, आणि असें कोर्ट भरविणाऱ्या अमलदारास योग्य वाटेल त्याप्रमाणें ते ब्रिटिश अमलदार असावेत किंवा एतद्देशीय अमलदार असावेत, किंवा ब्रिटिश व एतद्देशीय असे दोन्ही प्रकारचे अमलदार असावेत.

(२) ह्या आईनांस जोडलेल्या दुसऱ्या पुरवणींत दिलेल्या नमुन्यांत दरेक खटल्याच्या हकीकतीवरून जो फेरफार करणें जरूर असेल तो करून त्या नमुन्याबरहुकुम सदहू कोर्ट भरविण्याचा व त्यापुढें चाललेलें काम लिहून घेण्याचा अधिकार आहे :

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, असें कोर्ट भरविणाऱ्या अमलदारास, त्या कोर्टा-कडून व्हावयाच्या अशा कोणत्याही इनुसाफाच्या बाबतींत असा विशेष हुकुम करण्याचा अधिकार आहे कीं, त्या कोर्टांत देण्यांत येईल तो पुरावा, कैद्यानें आपल्या जाबांत सांगितलेल्या मजकुरासुद्धां पूर्णपणें लिहून घेतला पाहिजे.

समरी जनरल कोर्टमार्शला-चे अधिकार.

" आईन ९२.—समरी जनरल कोर्टमार्शलास जनरल कोर्टमार्शलचे सर्व अधि-कार असतील, आणि तें कोर्ट भरविण्याबावद्च्या हुकुमांत जें कांहीं फर्माविलें असेल त्यास अनुसरून, त्या कोर्टानें केलेला शिक्षेचा ठराव कायदेशीर होईल, व तो ठराव डिस्ट्रिक्ट कोर्टमार्शलास ज्या शिक्षेचा ठराव करण्याचा अधिकार आहे त्याहून जास्त शिक्षेचा नसला तर आणि इतर कोणत्याही प्रसंगीं असें कोर्ट भरविणारा अधिकारी बहाल करील तेव्हां, तो लागलाच अमलांत आणण्याचा अधिकार आहे.

समरी कोर्टमार्शल भरणें, त्याची रचना, आणि त्यास कोणत्या मनुष्यांचा इन्साफ कर-ण्याचा अधिकार आहे तें.

" आईन ९३.—(१) समरी कोर्टमार्शल भरून इन्साफ करण्याचा अधिकार—

(अ) मलिका मआज्ञमांच्या हिंदुस्थानच्या फौजेचें कोणतेंही कोर किंवा डिपार्टमेंट याच्या, किंवा त्या फौजेच्या कोणत्याही डिव्याचमेंटाच्या कांबटंट असलेल्या कमांडिंग आफिसरास,

(ब) हे आईन लागू असणारे एतद्देशीय कांबटंट लोक ज्या कोणत्याही ब्रिटिश कोराच्या किंवा डिव्याचमेंटाच्या दिमतीस असतील, त्या कोराच्या किंवा डिव्याचमेंटाच्या कमांडिंग आफिसरास,

आहे असें समजावें.

(२) दरेक समरी कोर्टमार्शलांत, तें भरणारा अमलदार हा एकटाच तें कोर्ट होय असें समजावें, परंतु त्यापुढें काम चालेल त्या सगळ्या वेळभर दुसरे दोन ब्रिटिश किंवा एतद्देशीय अमलदार तेथें हजर असले पाहिजेत; मात्र ह्याप्रमाणें हजर राहाण्याच्या संबंधानें ह्या दुसऱ्या अमलदाराकडून इकरार किंवा शपथ करवावयाची नाहीं असें समजावें.

(३) सदहू कोर्टापुढें चाललेलें काम इंग्रजी भाषेंत लिहून घेतलें पाहिजे, आणि तें लिहून झालें ह्मणजे त्यावर तें कोर्ट भरणाऱ्या अमलदारानें आणि तें काम चालू असतांना हजर असणाऱ्या अमलदारांनीं आपल्या सह्या केल्या पाहिजेत.

(४) समरी कोर्टमार्शलास, कोणताही अमलदार, ताब्यांतील वैद्यकीय अमल-दार किंवा वारंट अमलदार यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही मनुष्याचा इनुसाफ करण्याचा अधिकार आहेः मात्र, तो मनुष्य ह्या आईनांस पात्र असून तें कोर्ट भरणाऱ्या अमल-दाराच्या ताब्यांतला असला पाहिजे.

(५) आर्मी हास्पिटल कोराच्या कोणत्याही असामीचा समरी कोर्टमार्शलानें इनुसाफ करण्याचा अधिकार, तो असामी ज्या डिव्हिजनचा, डिस्ट्रिक्टचा, ब्रिगेडचा किंवा ठाण्याचा असेल, त्याचा ताबा असणाऱ्या अमलदारानें या बाबतींत अधिकार दिलेल्या कोणत्याही अमलदारास आहे.

समरी कोर्टमार्शलास ज्या गुन्ह्याचा इनुसाफ करण्याचा अ-धिकार आहे ते गुन्हे.

" आईन ९४.—समरी कोर्टमार्शलास, ह्या आईनांपैकीं कोणत्याही आईनाअन्वयें ज्या गुन्ह्याबद्दल शिक्षा करतां येईल त्या कोणत्याही गुन्ह्याचा इनुसाफ करण्याचा अधिकार आहेः

मात्र, तावडतोब इन्साफ करणें कोणत्याही मोठ्या कारणावरून जरूर नसेल, आणि वरिष्ठ अधिकाऱ्यास लिहून पाठविलें असतां शिस्तींत कमीपणा येण्यासारखा नसेल, तर समरी कोर्टमार्शलानें, त्याप्रमाणें लिहून पाठविल्यावांचून, पुढीलपैकीं कोणत्याही गुन्ह्यांचा इनुसाफ करतां कामा नये. ते गुन्हे येणेंप्रमाणेंः—

(अ) आईन ७ ते २३ ( दोन्ही धरून ) ह्यांपैकीं, किंवा आईन ९४ ते ९९ (दोन्ही धरून) ह्यांपैकीं कोणत्याही आईनांअन्वयें किंवा १७१ व्या आईनाअन्वयें ज्याबद्दल शिक्षा करण्याचा अधिकार आहे असा कोणताही गुन्हा;

(ब) सदर्हू कोर्ट भरणाऱ्या अमलदाराविरुद्ध कोणताही गुन्हा.

समरी कोर्टमार्शलाचे अधिकार.

"आईन ९५.—(१) कोणत्याही कोराच्या किंवा डिपार्टमेंटाच्या कमांडिंग आफिसरानें भरलेल्या समरी कोर्टमार्शलास, मरणाची किंवा काळ्या पाण्यावर पाठविण्याची, किंवा एक वर्षाहून जास्त मुदतीच्या कैदेची शिक्षा खेरीज करून, ह्या आईनांअन्वयें ज्या कोणत्याही इतर शिक्षेचा ठराव करतां येईल तशा शिक्षेचा ठराव करण्याचा अधिकार आहे.

(२) दुसऱ्या कोणत्याही अमलदारानें भरलेल्या समरी कोर्टमार्शलास, मरणाची किंवा काळ्या पाण्यावर पाठविण्याची, किंवा सहा महिन्यांहून जास्त मुदतीच्या कैदेची शिक्षा खेरीज करून, ह्या आईनांअन्वयें जी कोणतीही इतर शिक्षा देतां येते ती शिक्षा देण्याचा अधिकार आहे.

समरी कोर्टमार्शलाचा ठराव [फाइंडिंग] व त्यानें केलेला शिक्षेचा ठराव.

"आईन ९६.—समरी कोर्टमार्शलाचा ठराव व शिक्षेचा ठराव हे बहाल करण्याची जरुरी नसून, ते एकदम अमलांत आणण्याचा अधिकार आहे :

मात्र, इनसाफ करणाऱ्या अमलदाराची झालेली चाकरी पांच वर्षांहून कमी मुदतीची असेल, तर त्यानें, मोहिमेंत असल्याखेरीज, कोणताही शिक्षेचा ठराव, निदानपक्षीं कोराचा ताबा असणाऱ्या वरिष्ठ लष्करी अमलदाराकडून बहाली मिळेपर्यंत, अमलांत आणतां कामा नये.

समरी कोर्टमार्शलनें चालविलेलें काम पाठवून देणें.

"आईन ९७.—दरेक समरी कोर्टमार्शलानें चालविलेलें काम, ज्या डिस्ट्रिक्टमध्यें किंवा ज्या डिव्हिजनमध्यें किंवा ब्रिगेडमध्यें तो इनसाफ झाला असेल त्याचा ताबा असणाऱ्या अमलदाराकडे किंवा ठरविलेल्या अमलदाराकडे, विलंब न लावतां, रवाना केलें पाहिजे; आणि असा अमलदार किंवा इंडियाचे कमांडर-इन्-चीफ किंवा कमांडचा जनरल आफिसर याला, किंवा कोणत्याही कमांडच्या दिमतींत नसणाऱ्या फौजेंत असें कोर्ट भरलें असेल तेव्हां, अशा फौजेचा ताबा असणाऱ्या अमलदाराला, त्या खटल्याच्या गुणदोषांवरून, सदर्हू काम रद्द करण्याचा अधिकार आहे; केवळ सांकेतिक कारणांवरून तें रद्द करण्याचा अधिकार नाहीं."

१०० व्या आईनाच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

३३. सदर्हू आईनांपैकीं १०० व्या आईनाच्या बदला पुढील आईन दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:—

आरोपित मनुष्यास धरणें अगर कैदेंत ठेवणें.

"आईन १००.—(१) हे आईन लागू असणाऱ्या कोणा मनुष्यावर कोणत्याही गुन्ह्याचा आरोप आला असून त्याचा इनसाफ कोर्टमार्शलानें केला पाहिजे असें त्याच्या कमांडिंग आफिसरास किंवा इतर वरिष्ठ अमलदारास वाटेल तेव्हां त्यानें त्या आरोपित मनुष्याचा इनसाफ कोर्टमार्शलाकडून करतां येई तोंपर्यंत किंवा योग्य अधिकारी त्यास सोडी तोंपर्यंत त्यास लष्करी कैदेंत ठेवण्याविषयीं हुकूम केला पाहिजे.

(२) सदर्हू प्रकारच्या कोणत्याही मनुष्यास, न्यायाच्या कारणांकरितां जरूर असेल त्याहून जास्त वेळ लष्करी कैदेंत ठेवतां कामा नये."

१०१ ला आईन रद्द करणें.

३४. सदर्हू आइनांपैकीं आईन १०१ हा या कलमावरून रद्द केला आहे.

१०२ व्या आईनाच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

३५. सदर्हू आइनांपैकीं आईन १०२ याच्या बदला पुढील आईन दाखल करावा, तो येणेंप्रमाणें :—

दुभाषी.

"आईन १०२.—(१) दरेक कोर्टमार्शलास एक दुभाषी नेमला पाहिजे.

(२) ज्या ठाण्यांत किंवा जागेंत कोर्टमार्शल बसणार असेल तेथें योग्य रीतीनें लायक ठरलेला दुभाषी मिळत नसला, तर असें कोर्ट नेमणाऱ्या अमलदारानें, किंवा ज्या डिस्ट्रिक्टांत किंवा जागीं इन्साफ व्हावयाचा असेल त्यांत ताबा असणाऱ्या अमलदारानें, कोणत्याही योग्य मनुष्यास दुभाष्याचें काम करण्यास नेमलें पाहिजे.

(३) दुसरा कोणी लायक ठरलेला किंवा योग्य मनुष्य मिळत नसेल तेव्हां, सुपरिंटेंडिंग आफिसरानें, किंवा युरोपियन अमलदारांचें कोर्ट केलेलें असेल तेव्हां, प्रेसिडेंटानें, दुभाष्याचें काम केलें पाहिजे.

(४) समरी कोर्टमार्शलाकडून होणाऱ्या इन्साफाच्या प्रसंगीं, इन्साफ करणाऱ्या अमलदारास, किंवा इन्साफाच्या वेळीं हजर असणाऱ्या अमलदारांपैकीं एका अमलदारास, दुसरा कोणताही योग्य दुभाषी मिळत नसेल तर, दुभाष्याचें काम करण्याचा अधिकार आहे.

(५) कोणत्याही दुभाष्यास, दुभाषी या नात्यानें, कोणत्याही गोष्टींत मत देण्याचा अधिकार नाहीं."

३६. सदरहू आइनांपैकीं आईन १०३ याच्या बदला पुढील आईन दाखल करावें, तें येणेंप्रमाणें :— १०३ व्या आईनाच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

"आईन १०३.—(१) कोर्टमार्शलांत निदान जितके अमलदार असणें या आईनांवरून जरूर आहे त्यांहून त्यांची संख्या इन्साफाच्या सुरुवातीनंतर कमी झाली असतां त्या कोर्टाचें विसर्जन झालें असें समजलें पाहिजे. कोर्टाचें विसर्जन.

(२) जर ठराव होण्यापूर्वी कैदी अजारी असल्याच्या सबबीनें इन्साफ पुढें चालविणें अशक्य होईल, तर कोर्टमार्शलाचें विसर्जन केलें पाहिजे.

(३) ह्या आईनाअन्वयें जेव्हां कोर्टमार्शलाचें विसर्जन झालें असेल, तेव्हां कैद्याचा पुनः इन्साफ करण्याचा अधिकार आहे.

"आईन १०३ अ.—कोर्टमार्शलाच्या मेंबरांमध्यें कोणत्याही गोष्टीचा विचार होण्याच्यावेळीं, इतर सर्व मनुष्यांस कोर्टांतून लावून देण्याविषयीं हुकूम करण्याचा त्या कोर्टमार्शलाच्या प्रेसिडेंटास अधिकार आहे. कोर्टांतून इतर मनुष्यांस लावून देण्याचा अधिकार.

"आईन १०३ ब.—सदरहू कोर्टास योग्य वाटेल तेव्हां त्यास कोणतीही जागा तपासून पाहण्याचा अधिकार आहे." जागा तपासून पाहण्याचा अधिकार.

३७. सदरहू आईनांपैकीं आईन १०४ याच्या बदला पुढील आईन दाखल करावा, तो येणेंप्रमाणें :— १०४ व्या आईनाच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

"आईन १०४. कोणतेंही कोर्टमार्शल युरोपियन सनदी अमलदारांचें बनविलें असेल तेव्हां प्रेसिडेंटानें काम चालविलें पाहिजे." काम चालविणें.

३८. सदरहू आईनांपैकीं आईन १०७ यांत "कौन्सिलांतून झालेले हुकुमावरून कोर्टमार्शलें नेमलीं असतील तीं किंवा समरी कोर्टमार्शलें खेरीज करून इतर" या शब्दांच्या बदला "ऑर्डिनरी" हा शब्द दाखल करावा. १०७ व्या आईनाची सुधारणा.

३९. सदरहू आईनांपैकीं आईन १०८ याच्या नंतर पुढील आईन दाखल करावा, तो येणेंप्रमाणें :— १०८ व्या आईनानंतर नवीन आईन दाखल करणें.

"आईन १०८ अ.—समरी कोर्टमार्शलांत, दुभाष्यानें, फक्त, 'अधिकारी प्रसिद्ध करी तोंपर्यंत मी उघड करणार नाहीं' या शब्दांपर्यंतच इकरार किंवा शपथ घेतली पाहिजे." दुभाष्याचा इकरार किंवा शपथ.

४०. सदरहू आईनांपैकीं आईन ११४ हा या कलमावरून रद्द केला आहे. ११४ वा आईन रद्द करणें.

११६ व्या आईनाच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

४१. सदर्हू आईनांपैकीं आईन ११६ याच्या बदला पुढील आईन दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:—

एका गुन्ह्याच्या चार्जावरून दुसऱ्या गुन्ह्याच्या शाबितीचा ठराव करितां येतो.

"आईन ११६.—(१) कोर्टमार्शलापुढें ज्या कैद्यावर चाकरी सोडून पळून गेल्याचा चार्ज ठेविला असेल, त्याविषयीं, त्यानें चाकरी सोडून पळून जाण्याचा प्रयत्न केला असा किंवा तो रजेवांचून गैरहजीर राहिला असा ठराव करण्याचा अधिकार आहे.

(२) कोर्टमार्शलापुढें ज्या कैद्यावर चाकरी सोडून पळून जाण्याचा प्रयत्न करण्याचा चार्ज ठेविला असेल त्याविषयीं, तो चाकरी सोडून पळून गेला असा किंवा रजेवांचून गैरहजीर राहिला असा ठराव करण्याचा अधिकार आहे.

(३) कोर्टमार्शलापुढें ज्या कैद्यावर पुढील गुन्ह्यांपैकीं, ह्मणजे चोरी, लबाडीनें मालाचा गैरशिस्त उपयोग करणें किंवा तो आपल्या कामाला लावणें, अन्यायानें विश्वासघात करणें, किंवा लबाडीनें चोरीचा माल घेणें किंवा ठेवणें, यांपैकीं कोणत्याही एका गुन्ह्याचा चार्ज ठेविला असेल त्याविषयीं, त्यानें त्या गुन्ह्यांपैकीं दुसरा कोणताही गुन्हा केला असा ठराव करण्याचा अधिकार आहे.

(४) कोर्टमार्शलापुढें ज्या कैद्यावर ह्या आईनांअन्वयें इतर कोणत्याही गुन्ह्याचा चार्ज ठेविला असेल त्याविषयीं, विशेष कडक शिक्षा होण्याजोग्या स्थितींत केलेल्या कोणत्याही गुन्ह्याचा पुरावा होत नसेल तेव्हां, त्यानें तोच गुन्हा कमी कडक शिक्षा होण्याजोग्या स्थितींत केला असा ठराव करण्याचा अधिकार आहे."

११७ व्या आईनाच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

४२. सदर्हू आईनांपैकीं आईन ११७ याच्या बदला पुढील आईन दाखल करावे, ते येणेंप्रमाणें :—

पूर्वी शाबीत झालेल्या गुन्ह्यांचा व अब्रूचा पुरावा.

"आईन ११७.—(१) हे आईन लागू असणाऱ्या कोणत्याही मनुष्यानें कोणताही गुन्हा केल्याच्या शाबितीचा ठराव कोणतेंही कोर्टमार्शल करील तेव्हां, अशा कोर्टमार्शलानें, त्या मनुष्याविरुद्ध पूर्वी कोणत्याही कोर्टमार्शलाकडून किंवा फौजदारी कोर्टाकडून झालेल्या कोणत्याही शाबितीच्या ठरावाविषयीं चौकशी केली पाहिजे, व त्याबाबदचा पुरावा घेऊन तो दफ्तरांत दाखल केला पाहिजे, आणि त्या मनुष्याच्या अब्रूविषयीं चौकशी करून ती कशी आहे तेंही दफ्तरांत दाखल केलें पाहिजे.

(२) ह्या आईनाअन्वयें पुरावा घ्यावयाचा तो, मुखजबानीनें, किंवा कोर्टमार्शलांच्या बुकांतील किंवा इतर सरकारी दफ्तरांतील मजकूर किंवा सहीसुद उतारे यांच्या रूपानें घेण्याचा अधिकार आहे; आणि अशा सहीसुद उताऱ्यांवरील सही शाबीत करणें जरूर नाहीं; तसेंच, इन्साफ व्हावयाच्या मनुष्यास, त्याच्याविरुद्ध पूर्वी झालेले गुन्ह्यांच्या शाबितीचे ठराव व त्याची अब्रू यांबाबद पुरावा घेण्यांत येईल अशी सूचना इन्साफापूर्वी देणेंही जरूर नाहीं.

(३) समरी कोर्टमार्शलांत इन्साफ करण्याऱ्या कमांडिंग आफिसरास योग्य वाटेल तर, त्याला, गुन्हेगाराविरुद्ध पूर्वी झालेले गुन्ह्याच्या शाबितीचे ठराव व त्याची अब्रू हीं ह्या आईनाच्या सदरील ठरावांअन्वयें शाबीत करून घेण्याच्या बदला, तीं आपल्या स्वतःच्याच माहितीवरून लिहून दफ्तरीं दाखल करण्याचा अधिकार आहे.

पुराव्याबाबद सामान्य नियम.

"आईन ११७ अ.—वरील शेवटच्या आईनांतील ठराव लागू राहून, सन १८७२ चा हिंदुस्थानचा पुराव्याविषयीं आक्ट हा, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे त्यांत करावयाचे जे फेरफार व पुराव्याबाबद जे जास्त नियम जाहिरनामा प्रसिद्ध करून फर्मावितील त्यांस पात्र राहून कोर्टमार्शलापुढें चालणाऱ्या सर्व कामास लागू होईल असें समजावें."

४३. सदर्हू आईनांपैकीं आईन ११९ व १२० यांच्या बदला पुढील आईन दाखल करावे, ते येणेंप्रमाणें:—

आईन ११९ व १२० यांच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

"आईन ११९.—कोणत्याही कोर्टमार्शलानें मरणाच्या शिक्षेचा ठराव, त्या कोर्टाच्या मेंबरांपैकीं निदान दोनतृतीयांशांमेंबरांच्या अनुमतावांचून, करतां कामा नये.

मरणाच्या शिक्षेचा ठराव करण्यास जरूर असणारें बहुमत.

"आईन १२०.—(१) कोणत्याही कोर्टमार्शलानें चालविलेल्या कामाची व्यवस्था करण्याचा अधिकार दिलेल्या अमलदाराच्या हुकुमावरून, अशा कोर्टानें केलेल्या ठरावाची किंवा शिक्षेच्या ठरावाची एकदां तपासणी करण्याचा अखत्यार आहे, आणि अशा तपासणीच्यावेळीं त्या कोर्टास, त्या अमलदारानें तसें फर्माविलें असतां, जास्त पुरावा घेण्याचा अधिकार आहे.

ठरावाची किंवा शिक्षेच्या ठरावाची तपासणी.

(२) असल फैसला झाल्यावेळीं जे अमलदार हजीर होते तेच अमलदार तपासणीच्या वेळीं हजीर असले पाहिजेत: मात्र त्यांपैकीं कोणी निरुपायामुळें गैरहजीर असल्यास चालेल.

(३) सदरीं सांगितल्याप्रमाणें कोणताही अमलदार निरुपायामुळें गैरहजीर असला, तर त्याच्या गैरहजिरीचें कारण कोर्टाच्या कामांत योग्य सहीनिशीं दाखल केलें पाहिजे, आणि तदनंतर त्या कोर्टांत ह्या आईनांवरून कमींतकमी जितके अमलदार असणें जरूर आहे तितके असल्यास, तपासणीच्या कामास लागलें पाहिजे."

४४. सदर्हू आईनांपैकीं आईन १२२ ते १२४ (दोन्ही धरून) यांच्या बदला पुढील आईन दाखल करावे, ते येणेंप्रमाणें :—

आईन १२२ ते १२४ यांच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

"आईन १२२.—(१) जनरल कोर्टमार्शलाच्या बाबतींत जज्ज आड्व्होकेटास आणि इतर कोणत्याही कोर्टमार्शलाच्या बाबतींत इन्साफ करण्याविषयीं हुकूम करणाऱ्या अमलदारास, आपल्या सहीनिशीं समन करून कोणत्याही मनुष्यास साक्ष देण्याकरितां किंवा कोणताही दस्तऐवज किंवा इतर वस्तु हजर करण्याकरितां, समनांत सांगितल्यावेळीं व जागीं कोर्टापुढें हजर होण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार आहे.

साक्षीदारांस समन करणें व दस्तऐवज हजर करणें.

(२) साक्षीदार लष्करी अधिकाऱ्याच्या ताब्यांतला असेल तेव्हां, तें समन. तो ज्या कोराचा, डिपार्टमेंटाचा किंवा डिट्याचमेंटाचा असामी असेल त्याचा प्रत्यक्ष तावा असणाऱ्या अमलदाराकडे पाठविलें पाहिजे, आणि मग त्या अमलदारानें तें त्यावर बजाविलें पाहिजे.

(३) साक्षीदार इतर कोणताही मनुष्य असेल तेव्हां, तें समन, तो ज्या माजिस्ट्रेटाच्या हुकुमतींत असेल किंवा राहत असेल त्या माजिस्ट्रेटाकडे पाठविलें पाहिजे, आणि अशा माजिस्ट्रेटानें त्या साक्षीदाराची आपल्याच कोर्टांत जरूरी असल्याप्रमाणें तें समन अमलांत आणलें पाहिजे.

(४) साक्षीदाराच्या कबजांतील किंवा ताब्यांतील कोणताही विशेष दस्तऐवज किंवा वस्तु हजर करण्याविषयीं त्यास हुकुम करावयाचा असेल तेव्हां, त्या दस्तऐवजाचें किंवा वस्तूचें सोईनें जितकें बरोबर वर्णन लिहितां येईल तितकें त्या समनांत लिहिलें पाहिजे.

(५) या कलमांतील कोणत्याही ठरावावरून, सन १८७२ चा हिंदुस्थानचा पुराव्याविषयीं आक्ट, कलमें १२३ व १२४, यांस बाध येतो असें, किंवा तो ठराव टपाल खात्याकडील किंवा तारायंत्र खात्याकडील अधिकाऱ्याच्या ताब्यांतील कोणतेंही पत्र, पोस्टकार्ड, तारेची बातमी किंवा इतर दस्तऐवज यास लागू होतो असें, समजूं नये.

(६) जर सदर्हू अधिकाऱ्यांच्या ताब्यांतील कोणताही दस्तऐवज कोणत्याही कोर्टमार्शलाच्या कारणांकरितां जरूर आहे असें कोणत्याही जिल्हा माजिस्ट्रेटास, चीफ

प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटास, हायू कोर्टास किंवा सेशन कोर्टास वाटेल, तर अशा माजिस्ट्रेटास किंवा कोर्टास, तो दस्तऐवज, तो माजिस्ट्रेट किंवा तें कोर्ट सांगेल त्या मनुष्याच्या स्वाधीन करण्याविषयीं, प्रसंगाप्रमाणें, टपाल खात्याकडील किंवा तारायंत्र खात्याकडील अधिकाऱ्यांस फर्माविण्याचा अख्त्यार आहे.

(७) जर सदहू प्रकारचा कोणताही दस्तऐवज सदहू प्रकारच्या कोणत्याही कारणाकरितां जरूर आहे असें कोणत्याही इतर माजिस्ट्रेटास किंवा कोणत्याही पोलीस कमिशनरास किंवा डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट आफ् पोलीस यास वाटेल, तर त्यास, प्रसंगाप्रमाणें, टपाल खात्याला किंवा तारायंत्र खात्याला, अशा दस्तऐवजाचा शोध करवून तो, सदहू कोणताही जिल्हा माजिस्ट्रेट, चीफ् प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेट किंवा कोर्ट याचा हुकूम येई तोंपर्यंत ठेवून घेण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार आहे.

कोर्टाची बेअदबी.

"आईन १२३.—(१) योग्य रीतीनें समन केलेला जो कोणताही साक्षीदार व जो कोणताही मनुष्य कोर्टमार्शलासमक्ष कोर्टाची कोणत्याही प्रकारें बेअदबी करील, किंवा आईन ९६, ९७ किंवा ९८ यांत सांगितलेला कोणताही गुन्हा करील त्यास हे आईन लागू असल्यास, त्यावर सदरहू कोर्ट फर्मावील त्याप्रमाणें काम चालविलें पाहिजे.

(२) जर सदहू प्रकारच्या कोणत्याही साक्षीदारास किंवा मनुष्यास हे आईन लागू नसतील, तर त्या कोर्टमार्शलाच्या प्रेसिडेंटास, तो गुन्हा ज्या कोणत्याही माजिस्ट्रेटच्या हुकुमतीच्या स्थलसीमेंत केला असेल त्या माजिस्ट्रेटच्या कोर्टास तो आपल्या सहीनिशीं लिहून पाठविण्याचा अधिकार आहे, आणि मग त्या माजिस्ट्रेटास तो खटला घेण्याचा, आणि आरोपित मनुष्याची जें कांहीं सांगण्याची इच्छा असेल तें ऐकून घेऊन त्या खटल्याचा निकाल, सदरहू गुन्हा त्या माजिस्ट्रेटच्या कोर्टांत चाललेल्या कामांत केला असल्याप्रमाणें करण्याचा, अधिकार आहे.

कोर्टमार्शलास येणाऱ्या मनुष्यांचे हक्क.

"आईन १२४.—(१) कोणत्याही कोर्टमार्शलाचा कोणताही अध्यक्ष किंवा मेंबर, कोणताही जज्ज आड्व्होकेट किंवा सुपरिंटेंडिंग आफिसर, कोणत्याही कोर्टमार्शलापुढें चालणाऱ्या कोणत्याही कामांतील कोणताही पक्षकार किंवा त्याचा वकील किंवा मुखत्यार, आणि कोणत्याही कोर्टमार्शलापुढें हजर होण्याकरितां केलेल्या समनाबरहुकूम वागणारा कोणताही साक्षीदार, त्या कोर्टमार्शलास जात असतांना, त्यांत हजर असतांना किंवा त्याहून परत जातांना दिवाणी किंवा मुलकी प्रोसेसअन्वयें धरला जाण्यास पात्र होणार नाहीं असें समजावें.

(२) जर अशा कोणत्याही मनुष्यास अशा कोणत्याही प्रोसेसअन्वयें धरलें, तर त्यास त्या कोर्टमार्शलाच्या हुकुमावरून सोडून देण्याचा अधिकार आहे."

आईन १२५ ते १२९ हे रद्द करणें.

४५. सदहू आईनांपैकीं आईन १२५ ते १२९ (दोन्ही धरून) ह्यावरून रद्द केले आहेत.

१३०व्या आईनाची सुधारणा.

४६. आईन १३०, रकम (ड), वाक्य पहिलें, ह्यांत, "एक वर्षांहून" ह्या शब्दांच्या ऐवजीं "दोन वर्षांहून" हे शब्द दाखल करावे.

१३१व्या आईनाच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

४७. सदहू आईनांपैकीं आईन १३१ ह्याच्या ऐवजीं खालील आईन दाखल करावा; तो येणेंप्रमाणें:—

बर्तर्फी.

"आईन १३१.—कोर्टमार्शलानें ठरविलेल्या कोणत्याही शिक्षेबरोबर बर्तर्फीचीही शिक्षा ठरविण्याचा अधिकार आहे."

१३२व्या आईनाची सुधारणा.

४८. सदहू आईनांपैकीं आईन १३२, ह्यांत, "दरजा कमी करून" ह्या शब्दांच्या ऐवजीं "दरजा कमी करण्याचा अगर" हे शब्द दाखल करावे.

८९. सदहू आईनांपैकीं आईन १३३ ते १३७ (दोन्ही धरून) ह्यांऐवजीं खालील आईन दाखल करावे, ते येणेंप्रमाणें:— आईन १३३ ते १३७ ह्यांऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

"आईन १३३.—एकांत कैदेच्या शिक्षेचे कोणतेही ठरावावरून कोणत्याही मनुष्यास एकांतकैदेंत ठेवणें तें कोणत्याही बाबतींत एका खेपेस चवदा दिवसांहून अधिक ठेवूं नये; आणि अशा एकांत कैदेच्या मुदतींच्या दरम्यान, त्या मुदतींपेक्षां कमी नाहीं इतक्या मुदतीचें अंतर ठेविलें पाहिजे. दिलेली शिक्षा तीन महिन्यांपेक्षां अधिक असेल तेव्हां, त्या दिलेल्या एकंदर शिक्षेपैकीं कोणत्याही एका महिन्यांतली एकांत कैदेची शिक्षा सात दिवसांपेक्षां जास्त नसली पाहिजे, आणि अशा एकांत कैदेच्या शिक्षेच्या मुदतींच्या दरम्यान त्या मुदतींपेक्षां कमी नाहीं इतक्या मुदतीचें अंतर असलें पाहिजे. एकांतकैद.

"आईन १३४.—ज्या कोणत्याही गैरसनदी अमलदाराला, आईन १३२ ह्याच्या दुसऱ्या पारिग्राफांत नमूद केलेल्या शिक्षांपैकीं कोणतीही शिक्षा कोर्टमार्शलाकडून केली जाईल, त्या अमलदाराचा दरजा कमी होऊन तो शिपाई झाला असें समजावें. गैरसनदी अमलदारांस दरजा कमी करून शिपाई करणें.

"आईन १३५.—कोणत्याही गुन्ह्याची शाबिती झाली असतां, कोणत्याही जनरल, समरी जनरल, किंवा डिस्ट्रिक्ट कोर्टमार्शलास जी कोणतीही इतर शिक्षा देण्याचा अधिकार आहे त्या शिक्षेखेरीज आणखी, गुन्हेगाराचे मागील चाकरीचे मुदतीवरून अगर प्रकारावरून जास्ती पगाराविषयीं आणि फांटा मिळाला असतां पेन्शनाचे हक्काविषयीं त्यास जो फायदा एऱ्हवीं मिळाला असता तो सर्व अगदीं बुडविण्याची, अगर सदहू प्रकारचा फायदा पूर्वीचे चाकरीपासून झालेला असो किंवा पुढें चाकरी करण्याबद्दल होणारा असो तो सर्व अगदीं बुडवण्याची, अगर बढती, जास्त पगार किंवा पेन्शन किंवा इतर कोणतेंही ठरविलेलें कारण ह्यासाठीं लागू झालेली नोकरी बुडविण्याची, अगर कोणताही लष्करी अलंकार किंवा इनाम सरकारदाखल करण्याची, शिक्षा देण्याचा अधिकार आहे. पगार व पेन्शन सरकारदाखल करणें.

"आईन १३६.—हे आईन लागू असणाऱ्या कोणत्याही मनुष्याविषयीं कोणत्याही कोर्टमार्शलानें गुन्ह्याच्या शाबितीचा ठराव केला असतां, त्याचा चांगल्या वर्तणुकीबद्दलचा पगार, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांची आधीं मंजुरी आणवून वेळोवेळीं केलेल्या कानूंस व हुकुमांस अनुसरून, बंद होईल. गुन्ह्याच्या शाबितीचा ठराव झाला तर चांगल्या वर्तणुकीबद्दलचा पगार बंद करणें.

"आईन १३७.—कोणत्याही गुन्ह्याची शाबिती होऊन गुन्हेगारास जर चाकरींतून बर्तर्फ करण्याचा ठराव करण्यांत आला, किंवा त्यास दिलेल्या शिक्षेंत बर्तर्फीची शिक्षा येत असली, तर, त्या कोर्टाला, हुकुम करून,— चढलेला पगार सरकारदाखल करणें.

(अ) त्या गुन्हेगारास बर्तर्फ करण्याच्या वेळचा त्याचे पगाराचा व नेमणुकीचा चढलेला सगळा अगर कोणताही ऐवज किंवा त्यावेळीं त्यास सरकारांतून मिळणें असलेला सगळा अगर कोणताही पैका अगर

(ब) त्याचे वर्तणुकीमुळें जो तोटा अगर नुकसानी झाल्याबद्दल शाबिती झाली असेल तो तोटा अगर नुकसानी भरून येण्यास जरूर लागेल तो सदहू ऐवजाचा अगर पैक्याचा अंश,

सरकारदाखल करण्याची आणखी शिक्षा करण्याचा अधिकार आहे."

९०. सदहू आईनांपैकीं आईन १३८ ह्याचा पहिला पारिग्राफ ह्या कलमावरून रद्द केला आहे. १३८ व्या आईनाची सुधारणा.

९१. सदहू आईनांपैकीं आईन १३९ ह्यांत, पहिल्या पारिग्राफांत, "तथापि अमलदाराचा" अशी सुरुवात होणाऱ्या व "निमेहून अधिक कापण्याचा ठराव करूं नये" असा शेवट होणाऱ्या मजकुराच्या ऐवजीं, "तो, गुन्हेगाराच्या माहेवारी पगाराच्या व नेमणुकांच्या अर्ध्याहून अधिक कापण्याचा ठराव करूं नये" हा मजकूर दाखल करावा. १३९ व्या आईनाची सुधारणा

आईन १४२ ते १४९ हे रद्द करणें.

९२. सदर्हू आईनांपैकीं आईन १४२ ते १४९ (दोन्ही धरून) ह्या कलमावरून रद्द केले आहेत.

आईन १५० व १५१ ह्यांची सुधारणा.

९३. सदर्हू आईनांपैकीं आईन १५० व १५१ ह्यांत, "ज्या अमलदाराचे स्वाधीन असेल त्याकडे" ह्या शब्दांनंतर "सोईस पडेल तितक्या लवकर" हे शब्द दाखल करावे आणि "अगदीं जवळचा तुरुंग" ह्या शब्दांच्या बदला "तुरुंग" हा शब्द दाखल करावा.

१५१ व्या आईनांत जास्त मजकूर दाखल करणें.

९४. सदरीं शेवटीं उल्लेख केलेल्या आईनाच्या शेवटीं खालीं लिहिलेला विशेष ठराव जास्त दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:—

"मात्र इतकेंच कीं, तीन महिन्यांपेक्षां जास्त नाहीं इतक्या मुदतीची सदर्हू प्रकारच्या कैदेची शिक्षा ठरविण्यांत आली तर, बहाल करणाऱ्या अगर वरिष्ठ अमलदारास, अगर समरी कोर्टमार्शलच्या बाबतींत इन्साफ करणाऱ्या कमांडिंग आफिसरास, ती शिक्षा लष्करी कैदेंत भोगण्यांत यावी असें फर्मावण्याचा अख्त्यार आहे."

१५२व्या आईनाची सुधारणा.

९५. सदर्हू आईनांपैकीं आईन १५२ ह्यांत, "नेण्याविषयीं हुकूम करण्याचा अधिकार" ह्या शब्दांनंतर "इंडियाचे कमांडर इन् चीफ ह्यांच्या निर्बंधास पात्र राहून" हे शब्द दाखल करावे, आणि "कोणतेही इलाक्याचे कमांडर इन् चीफास आहे" ह्या शब्दांच्या ऐवजीं "कमांडच्या जनरल आफिसरास आहे" हे शब्द दाखल करावे.

सदर्हू आईनाची आणखी सुधारणा.

९६. सदरीं शेवटीं सांगितलेल्या आईनाच्या दुसऱ्या पारिग्राफाच्या प्रारंभीं, "सदर्हू निर्बंधास पात्र राहून," हे शब्द दाखल करावे, आणि त्या पारिग्राफांतल्या "इलाक्याचे" ह्या शब्दाच्या ऐवजीं "कमांडचे" हा शब्द दाखल करावा.

१५५ व्या आईनांत नवीन शब्द दाखल करणें.

९७. सदर्हू आईनांपैकीं आईन १५५ ह्यांत, "झाला त्या तारखेपासून" ह्या शब्दांनंतर "किंवा अशा शिक्षेच्या ठरावावर अपील करण्यांत येऊन तें नामंजूर झालें असेल तर त्या अपिलाच्या निकालाच्या तारखेपासून" हा मजकूर दाखल करावा.

सदर्हू आईनांत जास्त मजकूर दाखल करणें.

९८. सदरीं शेवटीं सांगितलेल्या आईनांत खालील जास्त मजकूर दाखल करावाः तो येणेंप्रमाणें:—

"मात्र, असा कोणताही मनुष्य मोहिमीवर असेल तेव्हां त्यास, त्या इन्साफाचें काम बहाल करण्यास किंवा त्याची इतर रीतीनें व्यवस्था करण्यास ह्या आईनांअन्वयें अधिकार दिलेल्या अमलदाराच्या हुकुमाअन्वयें रांकेमध्यें चाकरीवर राहूं देण्याचा अधिकार आहे, आणि अशा रांकेमध्यें त्याची जी चाकरी होईल, ती त्याच्या काळे पाण्याच्या शिक्षेच्या अगर कैदेच्या शिक्षेच्या मुदतीचा भाग ह्मणून गणली जाईल."

आईन १५६ ते १५९ हे रद्द करणें.

९९. सदर्हू आईनांपैकीं आईन १५६ ते १५९ (दोन्ही धरून) ह्या कलमावरून रद्द केले आहेत.

१६० व्या आईनाच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

६०. सदर्हू आईनांपैकीं आईन १६० ह्याच्याबदला खालील आईन दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:—

क्षमा करणें व शिक्षा माफ करणें.

"आईन १६०.—हे आईन लागू असणाऱ्या कोणत्याही मनुष्याविषयीं कोणत्याही कोर्टमार्शलाकडून कोणत्याही गुन्ह्याच्या शाबितीचा ठराव केला जाईल तेव्हां,

(अ) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस, अगर,

(ब) त्या मनुष्यावर सिव्हिल गुन्ह्याव्यतिरिक्त इतर कोणताही गुन्हा ठरविला असेल तेव्हां इंडियाचे कमांडर इन् चीफ ह्यांस किंवा कमांडच्या जनरल आफिसरास,

(१) त्या मनुष्यास क्षमा करण्याचा,

(२) त्यास दिलेली शिक्षा सगळी अगर अंशत: माफ करण्याचा,

(३) त्या मनुष्याची जी चाकरी अगर इतर फायदा त्याच्या शिक्षेच्या ठरावावरून बुडालेला असेल ती चाकरी अगर तो फायदा त्याम परत देण्याबद्दल हुकुम करण्याचा, अगर

(४) त्याला चाकरीवरून बर्तर्फ केलें असल्यास त्याला त्या चाकरीवर पुनः लावण्याचा,

अधिकार आहे ;

मात्र, कमांडच्या जनरल आफिसरानें, कोणत्याही मनुष्याची खालीं सांगितल्याप्रमाणें हकीकत असल्याशिवाय, ह्मणजे—

(१) त्या मनुष्यास शिक्षा करण्यांत आली तेव्हां, तो त्या जनरल आफिसराच्या अधिकारांत होता असें असल्याशिवाय, आणि

(२) तो मनुष्य त्या वेळपर्यंत नोकरींत असल्याशिवाय, किंवा त्यास चाकरींतून बर्तर्फ केलेलें असल्यास, त्यास ज्या कोरांतून किंवा डिपार्टमेंटांतून बर्तर्फ केलें ते कोर किंवा डिपार्टमेंट त्या आफिसराच्या अधिकाराखालीं त्या वेळपर्यंत राहिलेलें असल्याशिवाय,

ह्या कलमांत सांगितलेले अधिकार त्या मनुष्याच्या संबंधानें चालवूं नयेत.

६१. सदहू आईनांपैकीं आईन १६१ ह्यांतले "किंवा मद्रास सरकारचे किंवा मुंबई सरकारचे" हे शब्द रद्द करावे, आणि "कोणतेही इलाक्याचे कम्यांडर इन् चीफाचे सहीची अथवा कोणतेही इलाक्याचे दिमतीस नसणारे फौजेचे किंवा डिविजनाचे किंवा डिस्ट्रिक्टचे कम्यांडिंग आफिसराचे सहीची" ह्या मजकुराच्या बदला, "इंडियाचे कमांडर इन् चीफ किंवा कमांडचे जनरल आफिसर ह्यांचे सहीची किंवा कोणतेही कमांडचे दिमतीस नसणारे कोणतेही फौजेचा किंवा कोणतेही डिविजनचा किंवा डिस्ट्रिक्टचा ताबा असणारे अमलदाराचे सहीची" हा मजकुर दाखल करावा. — १६१व्या आईनाची सुधारणा.

६२. सदहू आईनांपैकीं आईन १६१ ह्याच्या नंतर खालील आईन दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:— — १६१व्या आईनाच्यानंतर एक नवीन आईन दाखल करणें.

"प्रोसीडिंग राखून ठेवणें.

"आईन १६१ अ.—(१) सर्व जनरल कोर्टमार्शलांचीं प्रोसीडिंग जज्ज ॲड्व्होकेट जनरलानें सात वर्षांपेक्षां कमी नाहीं इतक्या मुदतीपर्यंत राखून ठेविलीं पाहिजेत, आणि समरी जनरल कोर्टमार्शलांचीं आणि डिस्ट्रिक्ट कोर्टमार्शलांचीं प्रोसीडिंग हीं, त्यानें, ठराव व शिक्षेचा ठराव ह्यांच्या बहालीच्या तारखेपासून तीन वर्षांपेक्षां कमी नाहीं इतक्या मुदतीपर्यंत राखून ठेविलीं पाहिजेत. — कोर्टमार्शलांचीं प्रोसीडिंग राखून ठेवणें.

(२) रेजिमेंटल व समरी कोर्टमार्शलाचीं प्रोसीडिंग, कैदी ज्या कोरांतला अगर डिपार्टमेंटांतला असामी होता त्या कोराच्या अगर डिपार्टमेंटाच्या दप्तराबरोबर, तीन वर्षेंपर्यंत राखून ठेविलीं पाहिजेत.

(३) कोणत्याही कोर्टमार्शलाकडून इन्साफ झालेल्या कोणत्याही मनुष्यानें, ठराव व शिक्षेचा ठराव बहाल होणें जरूर असेल त्या बाबतींत तशी बहाली मिळाल्यानंतर आणि प्रोसीडिंगांचा नाश केला जाण्याच्या आधीं कोणत्याही वेळीं त्या प्रोसीडिंगांची व तपासणीचीं प्रोसीडिंग असल्यास त्यांची नकल मागितल्यास ती, त्याला, त्या नेंत्या नकलेबद्दल ठरींव दराप्रमाणें पैसा दिला असतां त्या प्रोसीडिंगांचा कबजा असणाऱ्या अमलदाराकडून अगर मनुष्याकडून मिळाली पाहिजे."

६३. सदहू आईनां पैकीं आईन १६२ ह्याच्याबदला खालील आईन दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:— — १६२ व्या आईनाच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

आईन लागू असणारा मनुष्य गैरहजर राहिला असतां त्याबद्दल चौकशी.

"आईन १६२.—(१) हे आईन लागू असणारा कोणताही मनुष्य योग्य हुकुमावांचून आपल्या कामावरून साठ दिवसपर्यंत गैर हजीर राहील तर, एक कोर्ट आफ् इनक्वैरी साधेल तितकें लवकर भरवावें, आणि त्या कोर्टानें, ठरींव रीतीप्रमाणें करविलेल्या ईकरारावर अगर शपथेवर, त्या मनुष्याच्या गैरहजिरीच्या संबंधानें, आणि त्याच्या स्वाधीन केलेला होता अशा सरकारी मालांत कांहीं तूट आलेली असल्यास त्या तुटीच्या संबंधानें, किंवा त्याच्या हत्यारांत, युद्धसामुग्रींत, सरंजामांत, यंत्रांत, कपड्यांत अगर जरूरीच्या जिन्नसांत कांहीं तूट आलेली असल्यास त्या तुटीच्या संबंधानें, चौकशी करावी, आणि तो मनुष्य योग्य हुकुमावांचून अगर इतर पुरेशा कारणावांचून गैरहजर राहिल्याबद्दल त्या कोर्टाची खातरी झाल्यास त्या कोर्टानें तो मनुष्य त्याप्रमाणें गैरहजर राहिला असें ठरवावें, व किती दिवस गैरहजर राहिला तें ठरवावें, आणि सदरील तूट दिसून आली असल्यास ती ठरवावी; आणि तो मनुष्य ज्या कोरांतला अगर डिपार्टमेंटांतला असेल त्या कोराच्या अगर डिपार्टमेंटाच्या कमांडिंग आफिसरानें सदहू ठराव त्या कोराच्या अगर डिपार्टमेंटांच्या कोर्टमार्शल बुकांत लिहून ठेवावा.

(२) गैरहजीर ह्मणून ठराव झालेला मनुष्य नंतर स्वतः येऊन हजीर न होईल किंवा धरण्यांत न येईल तर, सदहूप्रमाणें मजकूर लिहून ठेविला असेल तो, चाकरी सोडून पळून गेल्याचे गुन्ह्याचे शाबितीचे ठरावाप्रमाणें कायदेशीर ठराव आहे असें समजावें.

(३) गैरहजीर ह्मणून ठराव झालेला मनुष्य स्वतः होऊन हजीर होईल किंवा धरण्यांत येईल तर, त्या मनुष्याचा चाकरी सोडून पळून गेल्याबद्दलचा इन्साफ होईल त्या वेळीं, कोर्टमार्शल बुक ज्या अमलदाराचे स्वाधीन असेल त्याचे सहीचा ह्मणून असलेला सदहू प्रमाणें लिहून ठेविलेला मजकूर अगर तशी त्याची नक्कल, त्यांत लिहिलेल्या गोष्टींविषयीं, अनुमानिक पुरावा आहे असें समजलें जाईल; आणि त्यांत सांगितलेला मनुष्य व कैदी हे दोन्ही एकच आहेत असें शाबित झालें ह्मणजे, चाकरी सोडून पळून जाण्याचा गुन्हा केल्याची व त्या मजकुरांत लिहून ठेविलेली तूट आणण्याचा गुन्हा केल्याची त्यावर शाबिती करण्याचा अधिकार आहे."

१६३व्या आईनाची सुधारणा.

६४. सदहू आईनांपैकीं आईन १६३ ह्याच्या शेवटच्या पारिग्राफाऐवजीं खालील मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:—

"सदहू प्रकारची शिफारस, इंडियाचे कमांडर इन् चीफ ह्यांनीं किंवा कमांडच्या जनरल आफिसरानें किंवा सदहू मनुष्य ज्या फौजेंतला असेल ती फौज कोणत्याही कमांडच्या दिमतीस नसल्यास त्या फौजेचा ताबा असणाऱ्या अमलदारानें किंवा सदहू मनुष्य ज्या कोणत्याही जनरल आफिसराच्या कमांडखालीं चाकरी करीत असेल त्या आफिसरानें योग्य रीतीनें बहाल केली असतां त्या मनुष्यास त्या शिफारसीप्रमाणें, सदहू प्रकारचा चढलेला पैका मिळण्याविषयीं व चाकरी जमेस धरली जाण्याविषयीं हक्क प्राप्त होईल."

१६४व्या आईनाच्या ऐवजीं नवीन आईन दाखल करणें.

६५. सदहू आईनांपैकीं आईन १६४ ह्याच्याऐवजीं खालील आईन दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:—

दरज्या कमी करणें अगर शिपायी करणें.

"आईन १६४.—इंडियाचे कमांडर इन् चीफ, कमांडचा जनरल आफिसर, कोणत्याही कमांडच्या दिमतीस नसलेल्या कोणत्याही फौजेचा ताबा असणारा अमलदार आणि कोणत्याही डिस्ट्रिक्टचा, डिव्हिजनचा अगर ब्रिगेडचा ताबा असणारा अमलदार, ह्यास, आपआपल्या ताब्यांतील कोणत्याही गैरसनदी अमलदाराचा दरज्या कमीकरण्याचा अगर त्यास शिपाई करण्याचा अधिकार आहे."

आईन १६५ याची सुधारणा.

६६. सदहू आईनांपैकीं आईन १६५ ह्यांतल्या, "सदहू प्रकारची हलकी शिक्षा कोर्टमार्शलानें ठरवूं नये." येथपासून त्या आईनाच्या शेवटपर्यंतच्या मजकुराबद्दल खालील मजकूर दाखल करावा, तो येणेंप्रमाणें:—

"सदर्हू कमांडर इन् चीफ यांनीं मुद्दाम इतर रीतीचा ठराव केला असल्यावांचून, कोणताही एतद्देशीय अमलदार, ताब्यांतील वैद्यकीय अमलदार अगर वारंट आफिसर सदर्हू प्रकारचे कोणतेही हलके शिक्षेस पात्र आहे असें समजूं नये.

"हलकी शिक्षा झाली असतां चांगल्या वर्तणुकीबद्दलचा पगार बुडतोच असें नाहीं. परंतु इंडियाचे कमांडर इन् चीफ ह्यांचे जनरल आर्डरींत वेळोवेळीं फर्माविण्यांत येईल त्याप्रमाणें कमांडिंग आफिसराचे हुकुमावरून मुख्य शिक्षा ह्मणून चांगल्या वर्तणुकीचा पगार बुडविण्याचा अधिकार आहे.

"कोणतेही इतर हलके शिक्षेखेरीज आणखी चांगले वर्तणुकीचा पगार बुडविण्याचाही ठराव करण्याचा अधिकार आहे."

६७. सदर्हू आईनांपैकीं आईन १६६ ह्यांत, "किंवा मद्रासचे गवर्नर इन् कौन्सिलांनीं किंवा मुंबईचे गवरनर इन् कौन्सिलांनीं किंवा इतर कोणतेही इलाक्याचे सरकारानें" हे शब्द रद्द करावे. १६६ व्या आईनाची सुधारणा.

६८. सदर्हू आईनांपैकीं आईन १६८ ह्यांत "प्रेसिडेन्सीचे कम्यांडर इन् चीफानें" ह्या शब्दांच्या ऐवजीं "इंडियाचे कमांडर इन् चीफानें किंवा कमांडच्या जनरल आफिसरानें" हे शब्द दाखल करावे. १६८ व्या आईनाची सुधारणा.

६९. सदर्हू आईनांपैकीं आईन १६९ ह्यांत, दुसऱ्या पारिग्राफांत, "वारंट आफिसराचे" ह्या शब्दांच्या ऐवजीं "गैरसनदी अमलदाराचे" हे शब्द दाखल करावे. १६९ व्या आईनाची सुधारणा.

७०. सदर्हू आईनांपैकीं आईन १७० ह्याचा दुसरा पारिग्राफ व तिसरा पारिग्राफ हे ह्यावरून रद्द केले आहेत. १७० व्या आईनाचा कांहीं भाग रद्द करणें.

७१. सदर्हू आईनांपैकीं आईन १७१ ते १७९ (दोन्ही धरून) ह्यांच्या बदला खालील आईन दाखल करावे, ते येणेंप्रमाणें :— आईन १७१ ते १७५ ह्यांच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

"सिव्हिल गुन्हे.

"आईन १७१.—हे आईन लागू असणाऱ्या कोणत्याही मनुष्यानें ब्रिटिश इंडियाबाहेरील कोणत्याही जागीं कोणताही सिव्हिल गुन्हा केला तर त्यानें लष्करी कायद्याविरुद्ध गुन्हा केला असें समजलें जाईल, आणि तो गुन्हा केल्याबद्दल त्यावर ह्या आईनाअन्वयें चार्ज आणिल्यास, ह्या आईनांतले ठराव लागू राहून, तो त्या गुन्ह्याबद्दल ब्रिटिश इंडियांतल्या किंवा ब्रिटिश इंडिया बाहेरच्या कोणत्याही जागीं कोर्टमार्शलाकडून इन्साफ केला जाण्यास आणि शाबिती झाल्यास खालीलप्रमाणें शिक्षा केली जाण्यास पात्र होईल :— सिव्हिल गुन्ह्यांच्या संबंधानें लष्करी हुकुमत.

(अ) तो गुन्हा जर, ज्या गुन्ह्याबद्दल ब्रिटिश इंडियांतील कायद्याअन्वयें मरणाची किंवा काळे पाण्याची किंवा तीन वर्षांपेक्षां जास्त मुदतीच्या कैदेची शिक्षा देतां येते तसा गुन्हा असला, तर तो मनुष्य त्या अपराधाबद्दल ब्रिटिश इंडियांतील कायद्यांत सांगितलेली कोणतीहि शिक्षा भोगण्यास पात्र होईल; आणि

(ब) इतर बाबतींत, तो मनुष्य, त्या अपराधाबद्दल ब्रिटिश इंडियांतील कायद्यांत सांगितलेली कोणतीहि शिक्षा भोगण्यास किंवा सुव्यवस्था व लष्करी शिस्त ह्यांस बाध येणारें कृत्य करण्याबद्दल ह्या आईनांअन्वयें जी कोणतीही शिक्षा त्यास दिली जाईल, ती भोगण्यास पात्र होईल.

"आईन १७२.—गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस, जाहिरनामा देऊन, सदरील शेवटला आईन, हे आईन लागू असणाऱ्या कोणत्याही मनुष्यानें ब्रिटिश इंडियांत मोहिमीवर असतांना केलेल्या सिव्हिल गुन्ह्यांस अगर कोणत्याही वर्गाच्या सिव्हिल गुन्ह्यांस लागू करण्याचा आणि तो जाहिरनामा रद्द करण्याचा अधिकार आहे. १७१ वा आईन हा विवक्षित सिव्हिल गुन्ह्यांस लागू करणें.

विवक्षित गुन्ह्यांचा इन्साफ लष्करी कायद्याअन्वयें केव्हां करावयाचा तें.

"आईन १७३.—हे आईन लागू असणारा जो कोणताहि मनुष्य, ब्रिटिश इंडियांत किंवा ब्रिटिश इंडियाबाहेर, लष्करी कायदा लागू असणाऱ्या कोणत्याहि मनुष्याविरुद्ध खून, सदोष मनुष्यवध, अगर हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा, कलमें २२३ ते ३३९ ( दोन्ही धरून ) ह्यांपैकीं कोणत्याहि कलमाअन्वयें किंवा कलम ९०६ ह्याअन्वयें शिक्षा देतां येणारा गुन्हा, ह्यांपैकीं कोणताही गुन्हा करील, किंवा करण्याचा प्रयत्न करील, किंवा करण्यास साह्य करील, त्या मनुष्यानें लष्करी कायद्याविरुद्ध गुन्हा केला असें समजलें जाईल; आणि असा कोणताही गुन्हा केल्याबद्दल त्यावर ह्या आईनांअन्वयें चार्ज ठेविल्यास, ह्या आईनांचे ठराव लागू राहून, तो त्या गुन्ह्याबद्दल ब्रिटिश इंडियांतल्या किंवा ब्रिटिश इंडियाबाहेरील कोणत्याही जागीं कोर्टमार्शलाकडून इन्साफ केला जाण्यास, आणि शाबिती झाल्यास सदहू हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याबाबद कायदा ह्यांत त्या गुन्ह्यास सांगितलेली कोणतीही शिक्षा भोगण्यास, पात्र होईल.

विवक्षित गुन्ह्यांवर हुकुमत.

"आईन १७४.—जेव्हां सदरील आईनांपैकीं कोणत्याही आईनाअन्वयें, कोणत्याही गुन्ह्यासंबंधानें एकादें फौजदारी कोर्ट व एकादें कोर्टमार्शल ह्या दोघांसही हुकुमत असेल, तेंव्हां, त्या गुन्ह्यासंबंधाचें काम कोणत्या कोर्टापुढें चालावयाचें तें ठरविणें, ठरविलेल्या लष्करी अधिकाऱ्याच्या नजरेवर आहे. आणि तें काम कोर्टमार्शलापुढें चाललें पाहिजे असें त्या अधिकाऱ्यानें ठरविलें, तर त्या अधिकाऱ्यास, आरोपितास लष्करी कैदेंत ठेवण्याबद्दल हुकुम करण्याचा अधिकार आहे.

गुन्हेगारास स्वाधीन करण्यास फर्माविण्याचा फौजदारी कोर्टाचा अधिकार.

"आईन १७५.—(१) घडला ह्मणून ह्मणणें असलेल्या कोणत्याही गुन्ह्याच्या संबंधाचें काम आपणापुढें चाललें पाहिजे असा हुकुमत असणाऱ्या फौजदारी कोर्टाचा अभिप्राय असेल तेंव्हां त्या कोर्टास कोर्टमार्शल भरविणाऱ्या अधिकाऱ्याला किंवा ठरविलेल्या लष्करी अधिकाऱ्याला लेखी नोटीस देऊन असें फर्मावण्याचा अधिकार आहे कीं, त्यानें, आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें, गुन्हेगारावर कायद्याप्रमाणें काम चालविण्यासाठीं त्यास सर्वांत जवळच्या माजिस्ट्रेटाच्या स्वाधीन करावें किंवा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांकडे करावयाच्या इतलाचा निकाल येई तोंपर्यंत काम तहकूब ठेवावें.

(२) अशा प्रत्येक प्रसगीं सदहू अधिकाऱ्यानें सदहू नोटिशीबरहुकुम त्या गुन्हेगारास स्वाधीन करावें, किंवा त्या गुन्हेगारासंबंधाचें काम कोणत्या कोर्टापुढें चालावयाचें ह्या प्रश्नाचा निकाल करण्यासाठीं तो प्रश्न गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांकडे ताबडतोब पाठवावा: आणि अशा प्रश्नाचा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांकडून जो निकाल करण्यांत येईल, तो अखेरचा समजला जाईल."

आईन १७६ ते १७९ ह्यांच्या बदला नवीन आईन दाखल करणें.

७२. सदहू आईनांपैकीं आईन १७६ ते १७९ (दोन्ही धरून) ह्यांच्या ऐवजीं खालील आईन दाखल करावे, ते येणेंप्रमाणें:—

"सदर ६. मयत मनुष्यांचा व चाकरी सोडून पळून गेलेल्यांचा माल.

मयत मनुष्यांचा, चाकरी सोडून पळून गेलेल्या मनुष्यांचा व वेड्या मनुष्यांचा माल.

"आईन १७६.—हे आईन लागू असणाऱ्या वर्गांपैकीं असलेला जो कोणताही मनुष्य मरेल, लढाईंत मारला जाईल, अगर चाकरी सोडून पळून जाईल, त्याच्या मालाची व्यवस्था करण्यासंबंधाने खालील कानू केल्या आहेत:—

(१) कमांडिंग आफिसरानें त्या जागीं असलेला सगळा जंगम माल स्वाधीन करून घ्यावा, त्याची एक यादी करवावी, आणि त्या मयताचा अगर चाकरी सोडून पळून गेलेल्याचा येणें असलेला कोणताही पगार व नेमणुका घ्याव्या.

(२) ज्या मयत मनुष्याच्या नांवें कोणत्याही सरकारी सेव्हिंगव्यांकेमध्यें ( ह्यांत कोणत्याही नांवाच्या कोणत्याही पोस्टल सेव्हिंग ब्यांकेचाही समावेश होतो असें समजावें ) एक हजार रुपयांपेक्षां जास्त नाहीं इतकी अमानत रकम असेल, त्याच्या बाबतींत

कमांडिंग आफिसरास योग्य वाटल्यास त्यास, खात्याच्या कानूंत कांहींही असलें तरी ती अमानत रकम आपणास ताबडतोब देण्यांत यावी अशी त्या ब्यांकेच्या सेक्रेटरीस किंवा इतर योग्य अमलदारास मागणी करण्याचा अधिकार आहे; आणि अशा मागणीअन्वयें ती अमानत रकम देण्यांत आली ह्मणजे, ह्यानंतर ठरविण्यांत आलें आहे त्याशिवाय इतर कोणत्याही रीतीनें त्या रकमेवर कोणत्याही मनुष्याचा हक्क चालणार नाहीं.

(३) ज्या मयत मनुष्याचा वारचा त्या जागीं असून त्यानें, त्या मयताचीं पलटणींतलीं कर्जें (असल्यास) देऊन टाकण्याबद्दल जामीन दिलेला असेल, त्या मयत मनुष्याच्या बाबतींत, कमांडिंग आफिसरानें, सदहूं माल आणि ह्या आईनाची रकम (२) ही अन्वयें इशांकेंतली अमानतीची रकम घेतलेली असल्यास ती, हीं, त्या वारचाच्या स्वाधीन केलीं पाहिजेत.

(४) ज्या मयत मनुष्याच्या मालाची व्यवस्था ह्या आईनाच्या (३) ऱ्या रकमेअन्वयें करण्यांत आलेली नसेल त्या मयत मनुष्याच्या बाबतींत, आणि कोणत्याही चाकरी सोडून पळून गेलेल्या मनुष्याच्या बाबतींत, कमांडिंग आफिसरानें तो माल सार्वजनिक लिलावानें विकवावा, आणि त्या लिलावाच्या उत्पन्नांतून व ह्या आईनाच्या (२) ऱ्या रकमेअन्वयें अमानतीची रकम घेतलेली असल्यास तींतून, पलटणींसंबंधीं कर्जें असल्यास तीं आणि कापांतलीं किंवा छावणींतलीं इतर कर्जें असल्यास तीं देऊन टाकावीं आणि मयत मनुष्याच्या बाबतींत त्याच्या मर्तिकाच्या संबंधाचा खर्च द्यावा.

(५) कांहीं शिलक राहिल्यास ती, मयत मनुष्याच्या बाबतींत, त्याचा वारचा असल्यास त्यास आदा करावी, अगर, त्या मनुष्याच्या मृत्यूनंतर बारा महिन्यांच्या आंत त्या शिलकेवर कोणाचाही हक्क स्थापित न झाल्यास, ठरविलेल्या अमलदाराकडे पाठवून द्यावी.

(६) चाकरी सोडून पळून गेलेल्या मनुष्याचा माल विकण्यांत येईल त्या बाबतींत, कमांडिंग आफिसराच्या हातीं राहिलेली रकम, ठरविलेल्या अमलदाराकडे ताबडतोब पाठवून द्यावी.

"**आईन १७७**—कोणत्याही मयत मनुष्याच्या वारच्यास गेल्या शेवटल्या आईनाअन्वयें स्वाधीन करावयाचा माल व द्यावयाचा पैसा, त्याची एकंदर किंमत किंवा रकम एक हजार रुपयांपेक्षां जास्त नसल्यास व ठरविलेल्या अमलदारास योग्य वाटल्यास, त्या अमलदारास जो कोणताही मनुष्य तो घेण्यास अगर मयताच्या एस्टेटीची वहिवाट करण्यास हक्कदार आहे असें वाटेल, त्याला, प्रोबेट, वहिवाट चालविण्याविषयींची सनद सर्टिफिकेट किंवा ह्या प्रकारचा हक्काचा इतर खात्रीलायक पुरावा हजर करण्यास भाग न पाडतां, स्वाधीन करण्याचा व आदा करण्याचा अधिकार आहे; आणि ह्याप्रमाणें स्वाधीन केल्यानें व आदा केल्यानें, तसें करण्याचा हुकुम करणारे अगर तसें करणारे आणि हिंदुस्थानचे सेक्रेटरी आफ स्टेट इन् कौन्सिल हे त्या मालाच्या अगर पैक्याच्या संबंधाच्या पुढच्या सर्व जबाबदारींतून पूर्णपणें मुक्त होतात असें समजलें पाहिजे; परंतु ह्या आईनांत कांहींही असलें तरी, सदहूप्रमाणें ज्या कोणत्याही मनुष्यास माल स्वाधीन केलेला असेल अगर पैका आदा केलेला असेल त्या मनुष्यावरील मयत मनुष्याच्या कोणत्याही मृत्युपत्र चालविणाराच्या अगर वहिवाटदाराच्या अगर इतर वारच्याच्या अगर कोणत्याही धनकोच्या हक्कांस बाध येतो असें समजूं नये.

प्रोबेट इत्यादि हजर केल्याशिवाय विवक्षित मालाची व्यवस्था करणें.

"**आईन १७८.**—ज्या कोणत्याही मनुष्याविषयीं चाकरी सोडून पळून गेल्याचा शाबितीचा ठराव झालेला असेल अगर जो कोणताही मनुष्य आपल्या कामावरून साठ दिवसपर्यंत बेकायदेशीर रीतीनें गैरहजर राहून तदनंतर स्वाधीन झालेला अगर धरलेला नसेल, तो मनुष्य आईन १७६ ह्याच्या अर्थाअन्वयें, चाकरी सोडून पळून गेला असें समजलें पाहिजे.

आईन १७६ ह्यांत चाकरी सोडून पळून जाणें ह्या संज्ञेचा अर्थ.

"आईन १७९.—सदरीं शेवटीं सांगितलेल्या आईनाचे ठराव, लागू करतां येतील तेथवर, हे आईन लागू असणारा कोणताही मनुष्य वेडा झाल्यास त्याच्या बाबतींत लागू

आईन १७६ वेड्यांस लागू करणें.

केले पाहिजेत, आणि सन १८७७ चा लष्करी वेड्या मनुष्यांविषयीं आक्ट ह्यांत अधिकार दिल्याप्रमाणें त्याच्या पोषणासाठीं नेमणूक करून दिली पाहिजे."

भाग ३ याच्या बदला नवीन भाग दाखल करणें.

७३. सदहू आईनांपैकीं भाग ३ ह्याच्या ऐवजीं खालील भाग दाखल करावा, तो येणेंप्रमाणें :—

"भाग ३. किरकोळ.

पुनः इन्साफ करण्याची मनाई.

"आईन १८०.—हे आईन लागू असणारे ज्या कोणत्याही मनुष्यावरील गुन्हा कोणत्याही कोर्ट-मार्शलानें अगर फौजदारी कोर्टानें उडविला असेल किंवा ठरविला असेल, किंवा तशा ज्या कोणत्याही मनुष्याचा कोणत्याही गुन्ह्याबद्दलचा इन्साफ आईन १६५ अगर १६६ अन्वयें संक्षिप्त रीतीनें केला असेल, तो मनुष्य त्याच गुन्ह्याबद्दल कोणत्याही कोर्टमार्शलाकडून पुनः इन्साफ केला जाण्यास किंवा सदहू दोन आईनांपैकीं कोणत्याही आईनाअन्वयें संक्षिप्त रीतीनें इन्साफ केला जाण्यास पात्र होणार नाहीं.

कर्जाबद्दल धरलें जाण्याची माफी.

"आईन १८१.—(१) हे आईन लागू असणारा कोणताही मनुष्य, तो मलिका माआझमांच्या हिंदुस्थानच्या लष्करांपैकीं असे तोंपर्यंत, कोणत्याही सिव्हिल अगर रेव्हेन्यू कोर्टानें अगर त्या कोर्टाच्या अधिकाराअन्वयें किंवा कोणत्याही रेव्हेन्यू अमलदारानें किंवा त्याच्या अधिकाराअन्वयें काढिलेल्या प्रोसेसीवरून कर्जाबद्दल धरला जाण्यास पात्र नाहीं असें समजावें.

(२) अशा कोणत्याही कोर्टाच्या जज्जास, अशा कोणत्याही मनुष्यानें अगर त्याच्या वरिष्ठ अमलदारानें त्या मनुष्यास ह्या आईनांतील ठरावांविरुद्ध धरल्याबद्दल कोणतीही फिर्याद केली असतां तिच्याबद्दल चौकशी करण्याचा, आणि आपल्या सहीच्या वारंटानें त्या मनुष्यास सोडून देऊन फिर्यादीस वाजवी खर्च देण्याबद्दल ठराव करण्याचा अधिकार आहे; आणि हा खर्च, सदहू प्रोसेस मिळविणाऱ्या मनुष्यावर झालेल्या हुकुमनाम्यांत फिर्यादीस जर खर्च देवविला असता तर त्यास तो खर्च ज्याप्रमाणें वसूल करतां आला असता, त्याप्रमाणें फिर्यादीस वसूल करितां येईल.

(३) असा खर्च वसूल करण्याच्या कामीं फिर्यादीला कोर्टास कोणतीही फी द्यावी लागणार नाहीं.

जप्ती माफ असलेला माल.

"आईन १८२.—हे आईन लागू असणाऱ्या कोणत्याही मनुष्याचीं हत्यारें, कपडे साजसरंजाम, किंवा पलटणीसंबंधीं सामान किंवा जरूरीच्या जिनसा व त्याचप्रमाणें आपल्या हुद्याचें काम करण्याच्या कामीं तो वापरीत असेल तें कोणतेंही जनावर, धरतां कामा नये; त्याचप्रमाणें, अशा मनुष्यावर बजावावयाच्या कोणत्याही हुकुमनाम्याच्या किंवा हुकुमाच्या भरपाईसाठीं कोणत्याही सिव्हिल किंवा रेव्हेन्यू कोर्टानें किंवा कोणत्याही रेव्हेन्यू अमलदारानें केलेल्या हुकुमावरून त्या मनुष्याचा पगार व नेमणुका किंवा पगाराचा व नेमणुकीचा कोणताही भाग जप्त करतां कामा नये.

सदरील शेवटचे दोन आईन रिझर्व फौजेंतल्या लोकांस लागू करणें.

"आईन १८३.—हिंदुस्थानच्या रिझर्व फौजेंतील कोणत्याही मनुष्याला, अमलदार किंवा शिपाई ह्या नात्यानें शिकण्याच्या अगर नोकरीच्या कारणासाठीं बोलाविलें असतां अगर तसा कोणताही मनुष्य त्या नात्यानें शिकण्याच्या अगर नोकरीच्या कामीं गुंतलेला असतां किंवा त्या कामावरून परत येत असतां, त्याला, हे आईन लागू असणाऱ्या मनुष्यास गेल्या शेवटच्या दोन आईनांमध्यें जे हक्क दिलेले आहेत, ते सर्व हक्क मिळण्याचा हक्क आहे.

ज्या खटल्यांत एतद्देशीय अमलदार व शिपाई ह्यांचा संबंध असेल त्यांची सुनावणी कोर्टांनीं आधीं करणें.

आईन १८४.—(१) हे आईन लागू असणाऱ्या अमुक अमलदारास किंवा शिपायास कोर्टांत दावा किंवा इतर काम वादीतर्फे किंवा प्रतिवादीतर्फे चालविण्यासाठीं गैरहजिरीची रजा दिली आहे असा, किंवा त्यानें त्या कामासाठीं रजा मिळण्याकरितां अर्ज केलेला आहे असा योग्य लष्करी अधिकाऱ्याचा

दाखला त्या अमलदारानें किंवा शिपायानें किंवा त्या अमलदाराच्या किंवा शिपायाच्या वतीनें त्या कोर्टांत हजर केल्यास, त्या कोर्टानें, त्या अमलदाराकडून किंवा शिपायाकडून अर्जी झाल्यास, त्या दाव्याची अगर इतर कामाची सुनावणी व अखेर निकाल सदर्हूप्रमाणें दिलेल्या किंवा मागितलेल्या रजेच्या आंत करण्याची तजवीज, करवेल तेथवर, केली पाहिजे.

(२) सदर्हू प्रकारच्या योग्य लश्करी अधिकाऱ्याच्या दाखल्यांत, दिलेल्या किंवा मागितलेल्या रजेचा पहिला व शेवटला दिवस नमूद केलेला असला पाहिजे, आणि ती रजा ज्या दाव्याच्या संबंधानें देण्यांत आली अगर मागण्यांत आली त्या दाव्याचें वर्णन दिलें पाहिजे.

(३) असा कोणताही दाखला रुजू करण्याबद्दल किंवा सदर्हू प्रकारच्या कोणत्याही अमलदारानें किंवा शिपायानें किंवा त्याच्या वतीनें, त्याच्या दाव्याची सुनावणी आधीं होण्याकरितां केलेल्या कोणत्याही अर्जीबद्दल, त्या कोर्टांत कोणतीही फी भरावी लागणार नाहीं.

(४) सदर्हू प्रकारच्या दिलेल्या किंवा मागितलेल्या रजेच्या मुदतीच्या आंत त्या दाव्याची अगर इतर कामाची सुनावणी व अखेर निकाल करण्यास तें कोर्ट असमर्थ असल्यास, त्यानें तसें करण्यास असमर्थ असल्याचीं आपलीं कारणें लिहून ठेविलीं पाहिजेत, आणि त्या अमलदारानें किंवा शिपायानें मागितल्यास त्या कारणांची एक नकल त्यास देवविली पाहिजे; मात्र अशी नकल मागण्याच्या अर्जीबद्दल किंवा त्या नकलेबद्दल त्या अमलदाराकडून किंवा शिपायाकडून कोणताही पैसा घेतां कामा नये.

(५) सदर्हू प्रकारचा दाखला देण्यास लायक असा योग्य लश्करी अधिकारी कोणता असा प्रश्न कोणत्याही दाव्यांत उत्पन्न झाल्यास, तो, कोर्टानें, कोरचा ताबा असणाऱ्या सर्वांत जवळच्या अमलदाराकडे निकालासाठीं पाठवावा; आणि त्या अमलदारानें केलेला निकाल अखेरचा होय असें समजलें पाहिजे.

"आईन १८५.—(१) हे आईन लागू असणारा कोणी मनुष्य चाकरी सोडून पळून जाईल तेव्हां, तो ज्या कोराचा, डिपार्टमेंटाचा, अगर डिव्याचमेंटाचा असेल, त्या कोराच्या, खात्याच्या किंवा डिव्याचमेंटाच्या कमांडिंग आफिसरानें, त्यास जे सिव्हिल, राजकीय किंवा पोलीस अधिकारी त्या चाकरी सोडून पळून गेलेल्या मनुष्यास धरण्याच्या कामीं मदत करूं शकतील असें वाटेल त्या अधिकाऱ्यांकडे तो मनुष्य चाकरी सोडून पळून गेल्याबद्दल लेखी बातमी दिली पाहिजे; आणि अशी लेखी बातमी देण्यांत आली ह्मणजे त्या अधिकाऱ्यांनीं, तो चाकरी सोडून पळून गेलेला मनुष्य, ज्यास धरण्याविषयीं एकाद्या माजिस्ट्रेटानें वारंट काढिलें आहे असा मनुष्य आहे असें समजून, त्यास धरण्याची तजवीज केली पाहिजे, आणि त्यास धरल्यानंतर लश्करी कैदेंत ठेवण्यासाठीं स्वाधीन केलें पाहिजे. चाकरी सोडून पळून गेलेल्यांस धरणें.

(२) त्याचप्रमाणें सदर्हू अधिकाऱ्यांनीं, ज्या मनुष्यांस सदर्हू आईन लागू आहेत असा वाजवी गुमान असेल त्या मनुष्यांस, ते कामगिरीवर असल्याशिवाय किंवा त्यांस रजा किंवा फांटा दिल्याचा दाखला त्यांजवळ असल्याशिवाय, आपल्या हुकुमतींतल्या प्रदेशांमधून जाऊं देण्याची बंदी करण्याविषयीं जे इलाज आपणास अत्यंत योग्य वाटतील ते करून, तशी बंदी केली पाहिजे.

(३) जो मनुष्य ह्या आईनांस पात्र असून अधिकाराशिवाय एका जागेहून दुसऱ्याजागीं जात आहे असा वाजवी गुमान असेल त्या मनुष्यास वारंटाशिवाय धरण्याचा कोणत्याही पोलीस अमलदारास अख्त्यार आहे; आणि त्यानें त्यास, त्याची कायद्याप्रमाणें

तजवीज होण्याकरितां, विलंब न लावितां, सर्वांत जवळचे माजिस्ट्रेटाकडे किंवा कोणताही माजिस्ट्रेट लवकर मिळण्यासारखा नसल्यास सर्वांत जवळच्या लश्करी कमांडिंग आफिसराकडे हजर केलें पाहिजे.

लश्करी गुन्हेगारांस धरणें.

"आईन १८६.—हे आईन लागू असणाऱ्या कोणत्याही मनुष्यावर कोणताही लश्करी गुन्हा केल्याचा आरोप आलेला असून तो मनुष्य कोणत्याही सिव्हिल, राजकीय किंवा पोलीस अमलदाराच्या हुकुमतींत असेल, तेव्हां, त्यास धरून लश्करी अटकेंत देण्याच्या कामीं मदत करण्याविषयीं त्या मनुष्याच्या कमांडिंग आफिसराच्या सहीची लेखी दरखास्त आली असतां तसें करण्याच्या कामीं त्या अमलदारानें मदत केली पाहिजे.

सह्यांविषयीं काय समजावयाचें तें.

"आईन १८७.—ह्या आईनांअन्वयें चालत असलेल्या कोणत्याही कामामध्यें, जी कोणतीही अर्जी, दाखला, वारंट, जबाब, किंवा इतर दस्तऐवज सरकारच्या सिव्हिल किंवा लश्करी नोकरींतील अमलदाराच्या सहीचा ह्मणून असेल तो हजर केला असतां, तो ज्या मनुष्यानें ज्या हुद्याच्या नात्यानें सही केलेला ह्मणून असेल, त्या मनुष्यानें त्या हुद्याच्या नात्यानें योग्य रीतीनें त्यावर सही केलेली आहे असें, उलट शाबीत करण्यांत येई तोंपर्यंत, समजलें पाहिजे.

आर्मी कमांडखालीं असलेले सदर्हू लश्कराचे भाग.

"आईन १८८.—(१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस असें फर्माविण्याचा अधिकार आहे कीं, ह्या आईनांच्या कारणांसाठीं,—

(अ) कोणत्याही कमांडखालीं असलेला मलिका माआझमांच्या हिंदुस्थानच्या लश्कराचा कोणताही भाग, त्या कमांडच्या साधारण हद्दीच्या बाहेर नोकरी करीत असतांना, त्या कमांडच्या जनरल आफिसराच्या अधिकारास पात्र राहील; अगर

(ब) कोणत्याही कमांडखालीं नसलेला सदर्हू लश्कराचा कोणताही भाग कोणत्याही कमांडच्या दिमतीस दिला जाईल, आणि तो त्या कमांडच्या जनरल आफिसराच्या अधिकारास पात्र होईल.

(२) ह्या आईनाची रकम (१) हीअन्वयें जो हुकुम करण्यांत येईल तो शिवाय करून इतर बाबतींत, सदर्हू लश्कराचा कोणताही भाग कोणत्याही कमांडमध्यें चाकरी करीत असतांना, ह्या आईनांचे कारणांसाठीं, त्या कमांडच्या जनरल आफिसराच्या अधिकारास पात्र राहील.

इंडियाचे कमांडर इन् चीफ ह्यांस असलेल्या अधिकाराचा बचाव.

"आईन १८९.—इंडियाचे कमांडर इन् चीफ ह्यांस पार्लमेंटच्या कोणत्याही आक्टांत दिलेल्या किंवा रॉयल वारंट किंवा रॉयल कमिशनअन्वयें दिलेल्या अधिकारास ह्या आईनांतल्या कोणत्याही ठरावावरून बाध येतो असें समजूं नये.

कानू करण्याचा अधिकार.

"आईन १९०.—(१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस, जाहिरनामा देऊन, कोर्टमार्शलांनीं काम कसें चालवावें ह्याचें व ह्या आईनांअन्वयें कोणतीही हुकुमत अगर अधिकार असणाऱ्या लश्करी, सिव्हिल अगर राजकीय अमलदारांनीं काम कसें चालवावें ह्याचें नियमन करण्यासाठीं, आणि ह्या आईनांअन्वयें इन्साफ व्हावयाच्या गुन्ह्यांसंबंधाची चौकशी, त्यांचा इन्साफ व त्यांबद्दल शिक्षा ह्यांसंबंधाचे ह्या आईनांतले ठराव अमलांत आणण्यासाठीं, ह्या आईनांस जुळत्या अशा, कानू करण्याचा अधिकार आहे.

(२) ह्या आईनाअन्वयें करावयाच्या कानूंमध्यें इतर बाबतींशिवाय, खालील बाबतींसंबंधानेंही ठराव करण्याचा अखत्यार आहे:—

(अ) कोर्ट आफ इनक्वायरी भरविण्याच्या व त्यांनीं काम कसें चालवावें ह्याच्या संबंधानें;

(ब) कोर्टमार्शलें भरविण्याच्या व त्यांच्या रचनेच्या संबंधानें;

(क) कोर्टमार्शलें तहकूब करण्याच्या, त्यांचें विसर्जन करण्याच्या व त्यांच्या बैठकींच्या संबंधानें;

(ड) इन्साफ करितांना कोर्टमार्शलांनीं काम कसें चालवावें त्यासंबंधानें;

(इ) कोर्टमार्शलांनीं केलेल्या ठरावांच्या व शिक्षेच्या ठरावांच्या बहाली-संबंधानें व तपासणीसंबंधानें;

(फ) कोर्टमार्शलांनीं केलेले शिक्षेचे ठराव अमलांत आणण्याच्या संबंधानें;

(ग) ह्या आईनांतील ठरावांअन्वयें कोर्टमार्शलांच्या बाबतींत अगर काळे-पाण्याच्या किंवा कैदेच्या शिक्षेच्या बाबतींत करावयाच्या हुकुमांच्या नमुन्यांसंबंधानें.

(३) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस, सदर्हू प्रकारची कोणतीही कानू करून, कोणत्याही कोर्टमार्शलास किंवा अमलदारास, सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा ह्यांत अवल हुकुमतीच्या कोर्टास जो कोणताही अधिकार दिलेला आहे, तो ( आरोपित मनुष्याचा इन्साफ करण्याचा किंवा शिक्षा देण्याचा अधिकार शिवाय करून इतर अधिकार ) देण्याचा अधिकार आहे.

हिंदुस्थान सरकारच्या ताब्यांतील विवक्षित सैन्यास सदर्हू आईन लागू करण्याचा अधिकार.

आईन १९१. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांच्या अधिकाराअन्वयें हिंदुस्थानांत उभारून तयार ठेविलेल्या कोणत्याही सैन्यास ह्या आईनांतले सर्व किंवा कोणतेही ठराव, जाहिरनामा देऊन लागू करण्याचा, आणि असा कोणताही जाहिरनामा रद्द करण्याचा किंवा बदलण्याचा अधिकार गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस आहे.

(२) ह्या आईनांतले कोणतेही ठराव सदर्हू प्रकारच्या कोणत्याही सैन्यास लागू केलेले असतांना, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस, जाहिरनामा देऊन, त्या ठरावांच्या अमलामुळें उत्पन्न होणारी अशी कोणतीही हुकुमत, अधिकार किंवा कर्तव्येंहीं, त्या सैन्याच्या संबंधानें कोणत्या अधिकाऱ्यानें चालवावीं किंवा करावीं तें फर्माविण्याचा अख्त्यार आहे."

सदर्हू आईनांत दुसरी पुरवणी दाखल करणें.

७४. सदर्हू आईनांस जोडलेल्या पुरवणीच्या पुढें ह्या आक्टास जोडलेल्या परिशिष्टांतली दुसरी पुरवणी दाखल करावी.

---

## परिशिष्ट.

( कलम ७४ पाहा. )

### दुसरी पुरवणी.

( आईन ९१ पाहा )

### समरी जनरल कोर्टमार्शलें भरविण्याच्या हुकुमाचा व त्यांच्या प्रोसीडिंगांचा नमुना.

---

#### प्रोसीडिंग.

*येथें जागा लिहावी. मुक्काम * ; आज तारीख माहे सन १८ .

---

अ—कोर्ट भरविण्याचा हुकुम.

†कोर्टमार्शल भरवणारा अमलदार कमांडिंग आफिसर नसून फील्ड आफिसरच्या दर्ज्याच्या खालील दर्ज्याचा असेल तेव्हां हे शब्द राहूं द्यावे; इतर प्रसंगीं ते गाळावे.

सोबतच्या परिशिष्टांत नांवें दाखल केलेल्या लष्करी कायदा लागू असलेल्या मनुष्यांनीं त्या परिशिष्टांत सांगितलेले गुन्हे केले आहेत असें ज्या अर्थी मला दिसत आहे, आणि ज्या अर्थी खालीं सही करणारा व मोहिमीवर असलेली हिचा हल्लीं ताबा असणारा जो मी त्या माझा असा अभिप्राय आहे कीं, सरकारी कामाकडे योग्य लक्ष्य देतां, त्या गुन्ह्यांचा इन्साफ करण्यासाठीं कोणतेंही आॅर्डिनरी कोर्टमार्शल भरविणें ( †किंवा वरिष्ठ लायक अधिकाऱ्याकडे इतला करण्यासाठीं इन्साफाचें काम तहकूब ठेवणें ) साध्य नाहीं; त्या अर्थी मी ह्यावरून सदर्हू मनुष्यांचा इन्साफ करण्यासाठीं खालीं सांगितलेल्या प्रेसिडेंटाचें व मेंबरांचें समरी जनरल कोर्ट मार्शल भरावें असा हुकुम करितोंः—

प्रेसिडेंट.

| दर्ज्या | नांव | रेजिमेंट |
| --- | --- | --- |
| ............... | ............... | ............... |

मेंबर.

| दर्ज्या | नांव | रेजिमेंट |
| --- | --- | --- |
| ............... | ............... | ............... |
| ............... | ............... | ............... |
| ............... | ............... | ............... |

ब. चाळविलेल्या कामाबद्दल प्रेसिडेंटाचा दाखला.

मी दाखला देतों ऐसाजे, सदहू कोर्टानें तारीख माहे सन रोजीं भरून सदहू परिशिष्टांत नांवें दाखल केलेल्या मनुष्यांचा योग्य रीतीनें इन्साफ केला; आणि त्या प्रत्येक मनुष्याचें ह्मणणें, त्याच्या संबंधाचा ठराव व शिक्षेचा ठराव हीं त्या परिशिष्टाच्या तिसऱ्या व चवथ्या आसनांत सांगितल्याप्रमाणें होतीं.

आज तारीख माहे सन १८ रोजीं सही केली.

क................ ड................

कोर्ट-मार्शलाचा प्रेसिडेंट.

क. बहाली.

सदहू परिशिष्टाच्या शेवटच्या आसनांत सांगितलेल्या रीतीनें मीं सदहू ठरावांचा व शिक्षेच्या ठरावांचा निकाल केला आहे, आणि त्या आसनांत मीं जें कांहीं ह्मटलें आहे तें लागू ठेवून, मी ह्यावरून सदहू ठराव व शिक्षेचे ठराव बहाल करितों; आणि इन्साफाशिवाय दिलेली जी शिक्षा त्या परिशिष्टांत सांगितली आहे तिच्या संबंधानें माझा असा अभिप्राय आहे कीं, सरकारी कामाकडे योग्य लक्ष्य देतां ती कैदेची शिक्षा अमलांत आणितां येणार नाहीं (*आणि माझें असें मत आहे कीं, सरकारी कामाकडे योग्य लक्ष्य देतां हें खटले वरिष्ठ. लायक अधिकाऱ्याच्या बहालीसाठीं तहकुबीवर ठेवणें साध्य नाहीं).

*बहाल करणाऱ्या अमलदाराचें खटला तहकूब ठेवण्याचें साधारणपणें काम असेल तेव्हां मात्र हे शब्द राहू द्यावे, इतर प्रसंगीं ते गाळावे.

आज तारीख माहे सन १८ रोजीं सही केली.

इ................ फ................

फौजेंतला (अगर फौजेचा तांबा असणारा) फील्ड (अगर जनरल) आफिसर.

ड. तहकूब ठविलेल्या शिक्षांच्या ठरावांची बहाली.

तहकूब ठेविलेल्या ठरावांचा व शिक्षेच्या ठरावांचा सदहू परिशिष्टाच्या शेवटल्या आसनांत सांगितलेल्या रीतीनें मीं निकाल केला आहे, आणि त्या आसनांत मीं जें कांहीं ह्मटलें आहे तें लागू ठेवून, मी ह्यावरून सदहू तहकूब ठेविलेले ठराव व शिक्षेचे ठराव बहाल करितों.

आज तारीख माहे सन १८ रोजीं सही केली.

ग................ ह................

फौजेंतला जनरल (फील्ड) आफिसर.

इ. मरणाच्या किंवा दारुपणाच्या शिक्षेची बहाली.

परिशिष्टाच्या शेवटच्या आसनांत मीं जें कांहीं ह्मटलें आहे तें लागू ठेवून,

ह्याच्या खटल्यांतला (ठराव व) मरणाच्या शिक्षेचा ठराव व

ह्याच्या खटल्यांतला (ठराव) व काळेपाण्याच्या शिक्षेचा ठराव मी ह्यावरून बहाल करितों (†आणि सदरील मरणाच्या शिक्षेच्या ठरावांच्या संबंधानें माझा असा अभिप्राय आहे कीं, ‡ कारणान, सरकारी कामाकडे योग्य लक्ष देतां, माझ्याहून वरिष्ठ अशा कोणत्याही लायक अमलदाराच्या बहालीसाठीं हा खटला तहकुबीवर ठेवणें साध्य नाहीं).

† ही बहाली, चीफ कमांड असणाऱ्या अमलदारानें केलेली असेल तेव्हां हा मजकूर गाळावा.

‡ हकीकत असेल त्याप्रमाणें, तेथें, देशाचा प्रकार, मोठें अंतर किंवा शत्रूची गडबड यांपैकीं कोणतेंही कारण दाखल करावें.

आज तारीख माहे सन १८ रोजीं सही केली.

जे................ के................

फौजेची चीफ कमांड असणारा जनरल (फील्ड) आफिसर.

## परिशिष्ट.

तारीख माहे सन १८ . नंबर

| ज्यानें गुन्हा केला ह्मणून ह्मणणें असेल त्याचें नांव. * | ज्या गुन्ह्याचा चार्ज असेल तो गुन्हा. | आरोपितार्चे काय ह्मणणें आहे तें. | ठराव; व शाबितीचा ठराव असल्यास, शिक्षा. † | बहाली करणाऱ्या अमलदारानें कसा निकाल केला तें. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| रामबक्ष (बनिया) | देशाच्या रहिवाशाच्या शरीराविरुद्ध गुन्हा. | गुन्हा कबूल. | गुन्हा शाबीत. सक्त मजुरीची कैद .........ची. | बहाल केली. .........ची शिक्षा माफ करितों. इ.........फ...... |
| २६२, शिपाई झुंदा सिंघ, पलटण १६७ वी. | लूट मिळविण्यासाठीं घरफोडी. | गुन्हा नाकबूल. | गुन्हा शाबीत. सक्त मजुरीची कैद दोन महिन्यांची. | बहाल केला नाहीं. इ......... फ ...... |
| ९६४, स्वार हुसेन खान, पलटण १६ वी. | पोस्टावर असतांना दारू पिऊन मस्त असणें. | गुन्हा नाकबूल. | गुन्हा शाबीत. मरणाची शिक्षा. दया करावी अशी शिफारस आहे. | बहाली तहकूब ठेविली; किंवा शिक्षा बहाल करून तिच्याबदला सक्त मजुरीची ............ ...च्या कैदेची शिक्षा दिली. इ......... फ ...... बहाल केली, परंतु तिच्याबदला ............ ......वर्षांची काळेपाण्याची शिक्षा दिली. जे.........के ...... |
| फौजेच्या बरोबर असणारा मनुष्य (नांव माहीत नाहीं) बंडी व विजार पांढरी व उजव्या गालावर वण. | प्रोवोस्ट मार्शलास हरकत करणें. | गुन्हा नाकबूल. | गुन्हा केला नाहीं. | |

* गुन्ह्याचा चार्ज असलेल्या मनुष्याचें नांव माहीत नसलें तर, त्याचें नांव माहीत नाहीं ह्मणून लिहावें, आणि जिच्या योगानें त्यास ओळखतां येईल अशा प्रकारची जास्त माहिती दाखल करावी.

† दया करण्याबद्दल शिफारस असल्यास ती ह्या आसनांत दाखल करावी.

परिशिष्ट (पुढें चालू).

| ज्यानें गुन्हा केला ह्मणून ह्मणणें असेल त्याचें नांव.* | ज्या गुन्ह्याचा चार्ज असेल तो गुन्हा. | आरोपिताचें काय ह्मणणें आहे तें. | ठराव व शाबितीचा ठराव असल्यास शिक्षा.† | बाहाली करणाऱ्या अमलदारानें कसा निकाल लाविला. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| पलटण नंबर ६७ हींतील लश्करी पोशाक केलेला शिपाई (नांव माहीत नाहीं.) | देशाच्या रहिवाशाच्या मालमिळकती विरुद्ध गुन्हा. | गुन्हा नाकबूल. | गुन्हा शाबीत. सक्त मजुरीची कैदेची शिक्षा .........<br>............ची. | तहकूब ठेविली. इ.........फ .......<br>बहाल केली. ग.........ह ...... |
| पी. क्यू. कोर्टमार्शल भरविणारा अमलदार. | | सी. डी. प्रेसिडेंट. | | |

* गुन्ह्याचा चार्ज असलेल्या मनुष्याचें नांव माहीत नसलें तर, त्याचें नांव माहीत नाहीं ह्मणून लिहावें, आणि जिच्या योगानें त्यास ओळखतां येईल अशा प्रकारची जास्त माहिती दाखल करावी.

† दया करण्याबद्दल शिफारस असल्यास ती ह्या खानांत दाखल करावी.

(सही) जे. एम्. म्याकफर्सन,
डेप्युटी सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True Translation.)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.